# स्वामी विवेकानंदांच्या जयंतीनिमित्त
# ५0वी आंतर शालेय वक्तृत्व स्पर्धा - २०२४

## मराठी


**रामकृष्ण मिशन**

१२ वा रस्ता, खार पश्चिम, मुंबई ४०००५२

टेलिफोन : ६१८१८००० / ६१८१८००२

मराठी ज्युनियर (इयत्ता ५ ते ७)
विशेष सूचना :
१.प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.
२. कृपया विषयास धरून बोलावे.
३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :
(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण

# नरेनची आध्यात्मिक ओढ

असं म्हणतात की - जशी सकाळ, तसा दिवस. त्याचप्रमाणे कोणत्याही बालकामध्ये प्रकट असलेल्या एकूण गुणांना निरखून पाहिले असता त्याच्या भावी जीवनाचा पूर्वाभास होतो. नरेनविषयी असे म्हणता येईल की त्याच्या जीवनाची सकाळ खरोखरच मंगलमय होती ! आपले सुगठित सुंदर शरीर, गौर वर्ण, मोठे चमकदार डोळे आणि उभरत्या प्रतिभेने झळकणाऱ्या चेहऱ्यामुळे तो सहजच सर्वांचं प्रेम आकर्षित करीत असे. उंच भरारी घेणाऱ्या शेकडो स्वप्नांनी भरलेले मन, प्रेमाने ओत-प्रोत हृदय, कुशाग्र बुद्धी, असीम शौर्य, विलक्षण मौलिक प्रतिभा, अमाप कार्यक्षमता, अदम्य उत्साह - नरेन लहानपणापासूनच अद्वितीय होता. आणि सर्वतोपरी होती त्याची ईश्वराप्रती स्वाभाविक ओढ. लहानपणापासूनच तो ध्यानात निपुण होता. तसेच ईश्वरोपासना, प्रार्थना आणि देवाच्या शोधात तो आनंद मिळवित असे.

नरेनचा (अर्थात भावी स्वामी विवेकानंद ह्यांचा) जन्म सोमवार, १२ जानेवारी १८६३ रोजी झाला. तो मकर संक्रांतीचा दिवस होता - एक महान हिंदु सण. सण साजरा करणाऱ्या लाखो स्त्री-पुरुषांनी अजाणताच पूजा आणि प्रार्थनेद्वारे नवजात शिशुचे स्वागत केले. त्यांना कल्पनाच नव्हती की आपल्या देशाचा गौरव वाढविणारा, नव्या युगाचा अग्रदूत, भारताच्या आध्यात्मिक आणि राष्ट्रीय चेतनेला पुनर्घटित करणारा, नुकताच जन्माला आला होता, जो भविष्यात अखिल विश्वाला मुक्तीचा उपदेश अर्थात वेदांताचा संदेश देणारा महान दूत बनणार होता.

जेव्हा नवजात शिशुच्या नामकरणाची वेळ आली तेव्हा त्याविषयी पुष्कळ चर्चा झाली. सर्वांनी बाळाच्या आईला विचारले तेव्हा तिने बाळाच्या डोळ्यात खोलवर पाहिले, जणुकाही त्याच्या अंतरात्म्याचा ती वेध घेत होती. काही

क्षणांसाठी एक विलक्षण शांतता पसरली. नंतर भावुकतेने इतरांकडे वळून ती म्हणाली, '' त्याचे नाव विरेश्वर असो. त्याच नावाने तो ओळखला जाईल.'' ऐकणाऱ्यांना संतोष झाला. थोडक्यात ते त्याला 'बिले' म्हणू लागले. कालांतराने त्याला नरेंद्रनाथ किंवा नरेन असे पुकारण्यात येऊ लागले.

जेव्हा माता भुवनेश्वरी आपल्या मांडीवरील सुंदर, सुदृढ बालकाच्या चेहऱ्याकडे एकटक पाहत असे तेव्हा तिचे हृदय गर्वाने भरून जाई आणि तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहत; कारण अनेक प्रार्थनांचे फलस्वरुप, चिरवांछित तिचा लाडका तिला लाभला होता. पण तो काही कुणी साधारण बालक नव्हता. त्याच्यात प्रचंड सुप्त शक्ती होती आणि त्याच्या अदम्य चंचलतेला संयमित करण्याच्या कठीण समस्येला तिला तोंड द्यावे लागे. अजून तो तीन वर्षांचा देखील झाला नव्हता आणि त्याच्या विरुद्ध शांतता भंग करण्याच्या तक्रारी वाढतच होत्या.

नरेंद्रनाथ एक खोडकर मुलगा होता. चंचलतेच्या आवेशामुळे तो अनेकदा बेकाबू होत असे. अशा वेळेस तो कुटुंबियांना हैराण करून टाकत असे. लाच, धमक्या किंवा इतर कशालाही तो बधत नसे. अखेरीस माता भुवनेश्वरीच्या लक्षात आले की आक्रंद बालकाच्या मस्तकावर थंड पाणी ओतीत त्याच्या कानात 'शिव' 'शिव' असे म्हटले किंवा ''जर चांगला वागला नाहीस तर महादेव तुला कैलासात जाऊ देणार नाहीत.'', अशी धमकी दिल्यास तो शांत होऊन पूर्ववत उत्साही व आनंदी होई. अशा काही प्रसंगांनंतर माता भुवनेश्वरी म्हणत,'' मी महादेवाकडे पुत्रासाठी प्रार्थना केली परंतु त्याने तर आपला एक भूतच पाठविला आहे''. पण असे काही उद्रेक वगळता, तो एक हसतमुख, गोड आणि प्रेमळ मुलगा होता.

नरेनच्या प्राथमिक शिक्षणाच्या काळातच आध्यात्मिक जीवनाचे बीज पेरले गेले होते. राम आणि सीता ह्यांच्याविषयी त्याने सतत ऐकले होते. रामायणाच्या कथा त्याने आनंदविभोर होऊन ऐकल्या होत्या. तसेच रामाच्या संघर्ष व विजयाच्या दीर्घ गाथांमध्ये व्यक्तिगत रोमांचकारी साहस अनुभवले होते. कुटुंबातील वडीलधाऱ्यांना पूजा व ध्यान करताना पाहून त्याला वाटले की आपण सुद्धा रामाची पूजा करावी. एक दिवस त्याने हरी नावाच्या एका छोट्या मुलाबरोबर



जाऊन सीता-रामाची मूर्ती विकत घेतली आणि आजूबाजूला कोणी नसताना ते दोघे जिना चढून स्त्रियांच्या कक्षाच्या छपरावरील खोलीत गेले. व्यवस्थितपणे दार लावून घेतल्यावर त्यांनी मूर्तीची स्थापना केली व ध्यान करायला बसले. दरम्यान दोन्ही मुलांच्या पालकांना त्यांची दीर्घकाळाची गैरहजेरी जाणवली आणि चिंतित होऊन ते मुलांचा शोध घेऊ लागले. शोधता शोधता ते अखेरीस छपरावरील बंद खोलीजवळ येऊन पोहोचले. शोधकर्त्यांनी हाका मारल्या आणि दरवाजा ठोठावला पण उत्तर मिळाले नाही. अखेरीस त्यांच्या जोरदार धडकांनी कडी तुटली व दार उघडले. पहिल्याच अनिष्टसूचक संकेताने हरीचे ध्यान भंगले आणि तो जिन्यावरून खाली पळत सुटला. पण नरेनने मात्र काहीच ऐकले नव्हते. फुलांनी सुशोभित मूर्तींच्या समोर तो स्थिर, गंभीर ध्यानात मग्न होता. नावाने हाक मारल्यावर जेव्हा त्याने उत्तर दिले नाही तेव्हा हलवून त्याचे ध्यान भंग करण्यात आले, पण दृढतेने त्याने एकटे राहण्याचा आग्रह धरला. म्हणून सर्वांनी त्याला तसेच राहू दिले. पण हा सर्व प्रकार त्यांच्या समजण्यापलीकडचा होता कारण त्याच्या वयोमानानुसार तो विचित्र होता.

ह्यानंतर थोड्याच काळात घरातील कोचमनने नरेनच्या बालमनात खळबळ निर्माण केली. एक दिवस नरेन तबेल्यात गेला असता बोलता बोलता लग्नाचा विषय निघाला जो कोचमनला असह्य होता. काही वैयक्तिक कटु अनुभवांच्या आठवणींमुळे त्याने वैवाहिक जीवनाचा तीव्र निषेध करीत आपल्या छोट्या मित्राला त्यातील समस्या, मूर्खपणा आणि त्यापासून उद्‌भवणाऱ्या घोर बंधनाबद्दल सांगितले. नरेनला धक्काच बसला - जणुकाही विवाहाचे काळेकुट्ट सावट त्याच्यासमोर प्रत्यक्षच होते. आत त्याच्या सीता-रामाच्या मूर्तीचे काय ? त्याने आपलं संपूर्ण प्रेम आणि हृदयाची निष्ठा ह्या दोन पवित्र विभूतींना समर्पित करून भक्तिभावे त्यांची पूजा केली होती. त्यांच्या अद्वितिय चरित्राविषयी त्याच्या मनात विशेष आदर निर्माण झाला होता आणि त्यांच्या परस्पर निष्ठेबद्दल त्याला कौतुक वाटे. परंतु कोचमनने लग्नाच्या संकल्पनेत भयंकर अर्थ ओतला होता आणि सीता -राम तर विवाहित होते. एवढेच पुरेसे होते !

कोचमनचे शब्द आणि सीता-राम प्रती त्याचा आदर ह्यामधील परस्परविरोधी संघर्षाने त्याच्या हृदयात तीव्र दुःख निर्माण केले आणि त्याला रडू कोसळले. बालपणातील सोनेरी स्वप्नांपैकी एक स्वप्न भंग झाले होते. नरेन

स्त्रियांच्या कक्षाकडे धावला. आईने त्याचे अश्रु पाहिले आणि दु:खाचे कारण विचारले. आधी शांतता पसरली- मग मोठ्याने हुंदके देत त्याने विचारले - ''आता मी सीता-रामाची पूजा कशी करणार ? सीता तर रामाची पत्नी होती ना?'' माता भुवनेश्वरीला त्याची व्यथा जाणवली. पण त्याचं सांत्वन कसं करावं? मग अंधारात एकदम प्रकाश चमकावा तसा महादेवाचा विचार तिच्या मनात आला. आपल्या पुत्राला नरेन असे न म्हणता विरेश्वर ह्या नावाने संबोधून ती म्हणाली- ''तू महादेवाची पूजा करू शकतोस.'' आईचे हे शब्द नरेनच्या हृदयात खोलवर रुजले. दुसऱ्या दिवशी आईने दिलेल्या पैशांनी नरेनने महादेवाची मूर्ती विकत घेतली. लगेच तिची स्थापना केली आणि त्वरितच तो महादेवासमोर डोळे बंद करून ध्यानात मग्न झाला.

पण त्यात केवढे दारूण दु:ख सामावले होते. आपलं स्वप्न भंगल्यानंतर एखाद्या बालकाचे मन, आपली सगळी संपत्ती लुटून गेलेल्या व्यक्तीपेक्षाही अधिक दयनीय असते. मात्र सीता-रामाविषयी नरेनची भक्ती कधीही कमी झाली नाही आणि रामायणाबद्दल त्याचं आकर्षण कायमच राहिलं.

पण ह्यापुढे त्याने वैराग्याचे दैवत महादेवाची उपासना केली. लहानपणापासूनच संन्यासी बनण्याकडे त्याचा कल होता. घरातील वडीलधाऱ्यांनी नरेनला गमतीत सांगितले होते की जर कोणी ध्यान केले तर त्याचे केस साधूंप्रमाणे लांब आणि जटेसारखे होऊन वडाच्या पारंब्याप्रमाणे जमिनीत खोलवर जातात. म्हणून तो भाबडा मुलगा ध्यानात बसला असताना मधून मधून डोळे किलकिले करून आपले केस लांब आणि जटेसारखे झाले आहेत का ते पाहत असे. पण जेव्हा त्याच्या अपेक्षा पुऱ्या झाल्या नाहीत तेव्हा गोंधळलेल्या मन:स्थितीत तो आईकडे धावला आणि त्याने विचारले, ''मी ध्यान केले तरी माझे केस जटेसारखे का वाढले नाहीत?'' आईने त्याचे सांत्वन केले, ''ते एका तासात किंवा एका दिवसात वाढत नाहीत. तर, जटेसारखे केस वाढण्यासाठी अनेकानेक दिवस, होय, अनेकानेक महिने लागतात.'' नंतर गप्पांचा विषय बदलला आणि त्याने काही दिवसांपूर्वी खरेदी केलेल्या महादेवाच्या मूर्तीकडे वळला. तो म्हणाला की त्या सकाळी तो महादेवाच्या मूर्तीसमोर बसला असतांना त्याला आईचे शब्द प्रकर्षाने आठवले की त्याने खोड्या केल्या म्हणून त्याला महादेवापासून दूर पाठविण्यात आले होते. प्रत्येक हिंदु बालक अजाणताच पुनर्जन्माचे सत्य स्वीकारतो. म्हणून तो पुढे म्हणाला, ''मला वाटते की मी एकेकाळी साधु होतो; मी



जर चांगला वागलो तर महादेव मला आपल्याकडे परत बोलावून घेतील ना?'' आईने होकार दिला. परंतु कदाचित आपल्या आजोबांप्रमाणे नरेन देखील जगाचा त्याग करून महादेवाकडे परतणार ह्या विचाराने तिचे हृदय कंपित झाले. नंतर तिने तो विचार मनातून काढून टाकला. नरेनचा विवेक जागृत होऊन, सांसारिक सुखे असह्य ओझे वाटून ईश्वराच्या स्मरणातच आनंद अनुभवण्यास पुष्कळ वर्षे पडली होती असा विचार करून तिने आपल्या मनाचे समाधान केले.

मराठी ज्युनियर (इयत्ता ५ ते ७)
विशेष सूचना :
१.प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.
२. कृपया विषयास धरून बोलावे.
३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :
(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण

## स्वामी विवेकानंद - एक देशभक्त संत

आपण जेव्हा स्वामी विवेकानंदांच्या जीवनाचा अभ्यास करतो तेव्हा निश्चितपणे आपली खात्री झाल्याशिवाय राहत नाही की स्वामीजी सर्व दृष्टीने अद्वितिय होते. त्यांच्यासारखा भारतावर प्रेम करणारा, आपल्या देशाचा अभिमान बाळगणारा, तसेच त्याच्या हितासाठी उत्साहपूर्वक काम करणारा दुसरा कुणी नव्हता. स्वामीजींच्या विचारांद्वारे आपल्याला भारताच्या भूत, वर्तमान, आणि भविष्य काळाचे संपूर्ण चित्र मिळते. म्हणून रविंद्रनाथ टागोर रोमा रोलांना म्हणाले होते, ''जर तुम्हाला भारताविषयी जाणायचे असेल तर विवेकानंदांचा अभ्यास करा''

स्वत:विषयी बोलताना स्वामीजी एकदा म्हणाले होते की ते 'कंडेन्स्ड इंडिया' (संक्षिप्त भारत) होते. वास्तविक भारताप्रती त्यांचे प्रेम इतके प्रगाढ होते की अंतत: ते भारताचे मूर्तीमंत प्रतीक झाले. विवेकानंद आणि भारत एकरूप झाले. भगिनी निवेदिता ह्या विश्वासाची पुनरावृत्ती करताना म्हणतात,''भारत स्वामीजींचे सर्वोच्च प्रेम होते. भारत त्यांच्या हृदयाच्या स्पंदनात सामावला होता. भारत त्यांच्या नसानसात भिनला होता. भारत त्यांचं दिवास्वप्न होतं. भारताची आध्यात्मिकता, भारताची पवित्रता, भारताची बुद्धीमत्ता, भारताची शक्ती, भारतचे स्वप्न आणि त्याच्या भाग्याचे ते प्रतीक होते.''

१८९१ साली स्वामीजी माऊंट अबूला एका मुसलमान वकीलाच्या घरी अतिथी म्हणून राहिले होते. एक दिवस खेत्रीच्या राजाचे खाजगी सचिव, जगमोहनलाल, वकीलांच्या बंगल्यावर आले आणि एका हिंदु संन्याशाला तिथे पाहून आश्चर्यचकित झाले. स्वत:चे विस्मय लपवू शकत नसल्याने, जगमोहनलाल स्वामीजींना म्हणाले, ''स्वामीजी, तुम्ही तर हिंदु संन्यासी आहात,



तरी तुम्ही एका मुसलमानाकडे कसे राहता?'' स्वामीजी कोणत्याही प्रकारचा जाती आणि धर्माविषयीचा भेदभाव किंवा संकीर्णता लेशमात्र सहन करून शकत नव्हते. कठोर स्वरात ते उत्तरले,''महाशय, तुम्हाला काय म्हणायचं आहे? मी एक संन्यासी आहे. तुमच्या सर्व सामाजिक रूढींच्या पलिकडे आहे. अस्पृश्य म्हणवणाऱ्या लोकांबरोबर सुध्दा मी भोजन करू शकतो. मला देवाची भीती नाही. कारण त्यास त्याची सम्मत्ती आहे. मी शास्त्रांना भीत नाही. कारण ते त्यास अनुमती देतात. मला फक्त तुमची आणि तुमच्या समाजाची भीती वाटते. तुम्हाला देवाविषयी आणि शास्त्रांविषयी काहीही माहीत नाही. मी सर्वत्र ब्रह्म पाहतो, अतिक्षुद्र जीवात सुद्धा. माझ्यासाठी उच्च किंवा नीच असं काहीही नाही. शिव ! शिव !'' स्वामीजींच्या प्रत्येक शब्दातून निखारे वर्षत होते. मुन्शी जगमोहनलाल त्यांच्या भव्य व्यक्तिमत्वासमोर मंत्रमुग्ध झाले.

एकदा कोणीतरी स्वामीजींना सांगितले की, 'संन्याशाला स्वत:च्या देशाविषयी विशेष आसक्ती नसावी. उलटपक्षी, त्याने सर्व देशांना आपलेसे मानले पाहिजे.' ह्यावर स्वामीजींनी उत्तर दिले,''जो स्वत:च्या आईवर प्रेम करून तिला आधार देऊ शकत नाही, तो दुसऱ्याच्या आईचं भरण-पोषण कसं करू शकणार?'' स्वामीजींना असे म्हणायचे होते की संन्याशाने सुद्धा आपल्या मातृभूमीवर प्रेम केले पाहिजे. जो स्वत:च्या देशावर प्रेम करू शकत नाही, तो जगाला आपलेसे कसे करणार? प्रथम देशप्रेम, नंतर विश्वप्रेम.

स्वामीजी अत्यंत स्वाभिमानी होते आणि त्याचप्रमाणे सर्व भारतीयांनी आपल्या स्वाभिमानाविषयी तितकेच जागरूक असायला हवे असे त्यांना वाटत असे. त्यांच्या पश्चिमेकडील प्रवासापूर्वी घडलेल्या पुढील घटनेवरून हे स्पष्ट होते.

स्वामीजी आणि जगमोहनलाल अबू-रोड रेल्वे स्टेशनवर मुंबईकडे जाणाऱ्या रेलगाडीच्या डब्यात बसून गाडी सुटण्याची वाट पाहत होते. त्यांना सोडायला आलेला स्वामीजींचा एक बंगाली प्रशंसक सुद्धा डब्यात होता. तेवढ्यात एक युरोपियन तिकीट कलेक्टर आला आणि त्याने त्या गृहस्थांना कठोरपणे गाडीतून उतरायला सांगितले. ते गृहस्थ सुद्धा एक रेल्वे कर्मचारी होते. त्यांनी टी.सी. ला समजावण्याचा प्रयत्न केला की आपण कोणतेही बेकायदेशीर

काम केलेले नव्हते. पण टी.सी. त्यांचं म्हणणं ऐकायला तयारच नव्हता. परिणामी तीव्र वादविवाद होत असताना, स्वामीजींनी स्वत: मध्यस्थी केली. पण त्या टी.सी. ने त्यांना एक सर्व सामान्य संन्यासी समजून उद्धटपणे म्हटले,'' तुम काहे बात करते हो?'','' तू कशाला मध्ये पडतोस?''

हिंदी शब्द 'तुम' घनिष्ट मित्रांना किंवा निम्न स्तरातील लोकांना संबोधण्यासाठी वापरतात तर 'आप' शब्दाचा उपयोग बरोबरीच्या, वरिष्ठ किंवा वडीलधाऱ्या व्यक्तींसाठी केला जातो. स्वामीजी तिरस्कारयुक्त 'तुम' ह्या शब्दाने क्रोधित झाले. ते म्हणाले,'' 'तुम' म्हणजे काय? तुम्हाला नीट वागता येत नाही का? तुम्हाला शिष्टाचार माहीत नाही. तुम्ही 'आप' का म्हणत नाही.'' टी.सी. ला त्याची चूक लक्षात आली अणि म्हणाला,''मला क्षमा करा, मला तुमची भाषा नीट येत नाही. मला फक्त ह्या माणसाला...'' स्वामीजींनी त्याला मध्येच थांबवले आणि म्हणाले,''आताच तुम्ही म्हणालात की तुम्हाला हिंदी भाषा नीट येत नाही. आता असे दिसत आहे की तुम्हाला तुमची स्वत:ची भाषा देखील नीट येत नाही. हा माणूस ज्याच्याविषयी तुम्ही बोलत आहात, एक सद्‌गृहस्थ आहे.'' स्वामीजीनी मग त्या युरोपियन माणसाला सांगितले की ते त्याच्या अपमानास्पद वर्तनाबद्दल अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविणार आहेत. भयभीत झालेला टी.सी. घाईघाईने डबा सोडून गेला.

टी.सी. गेल्याबरोबर स्वामीजी जगमोहनलालकडे वळून म्हणाले, ''हे बघा, युरोपियन लोकांशी व्यवहार करताना आपण आपला आत्मसन्मान बाळगायला हवा. इतरांप्रमाणे आपण सुद्धा आपल्या पद प्रतिष्ठेविषयी नेहमी जागरूक असायला हवे. दुर्दैवाने आपण तसे करण्यास अयशस्वी होतो आणि ही असफलताच इतरांना आपला अपमान करण्यास उत्तेजित करते. कोणत्याही परिस्थितीत आपण आपल्या स्वाभिमानाचे रक्षण केले पाहिजे नाहीतर आपण कमी लेखले जाऊन अपमानितच होत राहणार. लक्षात ठेवा, कायरताच सगळ्या भ्रष्टाचाराचे आणि अनिष्ट कार्यांचे उगमस्थान आहे. भारतीय लोक पृथ्वीवरील इतर लोकांच्या तुलतेन कमी सुसंस्कृत नाहीत, तरी ते नेहमीच स्वत:चे अवमूल्यन करतात. म्हणूनच कोणीही सोम्या-गोम्या येतो आणि आपला अपमान करण्याचे धाडस करतो आणि आपण ते चूपचाप सहन करतो.''

अशा प्रकारे स्वामी विवेकानंदांनी भारतीयांना आपल्यां देशावर प्रेम करून



त्याचा आदर करण्यास शिकविले. त्यांना पूर्ण विश्वास होता की जगाला पाश्चिमात्य भौतिकवादापेक्षा भारतीय आध्यात्मिक संपत्तीची अधिक आवश्यकता होती. आणि ह्या दृढ विश्वासानेच त्यांना पाश्चिमात्य संस्कृतीच्या चकाकणाऱ्या वैभवाने विचलित होऊ दिले नाही, तसेच ते क्षणभर देखील कोणत्याही न्यूनगंडाने त्रस्त झाले नाहीत. आणि ह्याच अढळ विश्वासाने प्रेरित होऊन त्यांनी भारतीय सभ्यता आणि संस्कृतीच्या गौरवाची घोषणा केली. त्यांच्या साहस आणि विश्वासाच्या बळानेच पश्चिमेतील हजारो लोकांना भारत आणि तिच्या संस्कृतीवर प्रेम करण्यास प्रेरित केले ह्यात संशय नाही.

ऐतिहासिक धर्ममहासभेत डॉ. ॲनी बेझंटने लिहिले - ''लोक त्यांना योद्धा संन्यासी म्हणत. त्यांचा प्रथम प्रभाव संन्यासी रुपाचा नसून योद्धा म्हणून होत असे. ते विश्वातील सर्व शाश्वत धर्मांपैकी सर्वात प्राचीन अशा सनातन धर्माचे प्रतिनिधी असून त्यांचे व्यक्तीमत्त्व देशाभिमान आणि स्वजातीच्या अभिमानाने प्रफुल्लित होते.''

सर्व-धर्म परिषदेतील प्रथम व्याख्यानानंतर स्वामीजी इतके प्रसिद्ध झाले की शिकागो येथील अनेक प्रतिष्ठित मान्यवरांनी त्यांना आपल्या घरी आमंत्रित केले. प्रत्येकाला त्यांचे आतिथ्य करायचे होते. परिषदेच्या पहिल्या दिवसाच्या सत्रानंतर स्वामीजींना एका श्रीमंत व्यक्तीच्या आलिशान निवासस्थानात नेण्यात आले जिथे त्यांचे भव्य स्वागत झाले. यजमानाने स्वामीजींच्या सुख-सुविधेसाठी पूर्ण सोय केली होती. परंतु स्वामीजींना कीर्तीची लालसा नव्हती किंवा शारीरिक आरामाची गरज नव्हती. म्हणून त्या ऐषारामातदेखील अमेरिकन लोकांकडून प्रचंड प्रशंसा मिळूनसुद्धा स्वामीजी अस्वस्थ होते. आपले देशबांधव किती घोर दु:ख भोगत आहेत हे विसरू शकत नव्हते. भारतासाठी त्यांचे हृदय व्यथित होत होते आणि त्या मखमली पलंगावर त्यांना झोप लागली नाही म्हणून ते जमिनीवर झोपले आणि रात्रभर एखाद्या लहान मुलाप्रमाणे रडत राहिले आणि त्यांनी प्रार्थना केली,'' हे माते! माझा देश घोर दारिद्र्यात असताना यशाची पर्वा कोण करील? आपण भारतीय लोक इतके गरीब आहोत की मूठभर अन्नासाठी लाखो लोक मरत असतात आणि इथं स्वत:च्या सुख सोयीसाठी लोक पाण्यासारखा पैसा खर्च करतात. भारतीयांना अन्न कोण देणार? त्यांचा उद्धार कोण करणार? हे माते! मी कोणत्या प्रकारे त्यांची सेवा करू?'' असे होते भारतासाठी स्वामीजींचे ज्वलंत प्रेम.

स्वामी विवेकानंदांच्या संपर्कात येणाऱ्या सर्व व्यक्तींना ते भारतावर प्रेम करण्यास प्रेरित करत. त्यांच्या एका अमेरिकन शिष्या सिस्टर क्रिस्तीनने ह्या संबंधात लिहिले आहे - ''मला वाटते आम्ही पहिल्यांदा त्यांच्या ओजस्वी वाणीत ''इंडिया'' हा शब्द ऐकला, तेव्हाच आमचे भारतावरचे प्रेम जन्मास आले.''

लंडनहून परतताना स्वामीजींच्या एका इंग्रज मित्राने त्यांना विचारले, ''स्वामीजी, सुखसोयींनी परिपूर्ण, वैभवशाली, शक्तीसंपन्न पश्चिमेतल्या चार वर्षांच्या अनुभवानंतर आता तुम्हाला तुमची मातृभूमी कशी वाटते?'' स्वामीजींनी उत्तर दिले, ''इथे येण्यापूर्वी मी भारतावर प्रेम करत होतो. आता तर भारताची धूळ सुद्धा माझ्यासाठी पवित्र बनली आहे. तिथली हवा सुद्धा माझ्यासाठी पवित्र बनली आहे. ती आता एक पुण्यभूमी आहे, एक धर्मक्षेत्र, एक तीर्थ!''

ૹ○ૡ



मराठी ज्युनियर (इयत्ता ५ ते ७)

विशेष सूचना :

१.प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.

२. कृपया विषयास धरून बोलावे.

३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :

(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण

## शिवभावे जीव सेवा

नरेंद्रचे वडील विश्वनाथ दत्त आपल्या दानशूर वृत्तीसाठी प्रसिद्ध होते. महेंद्रनाथ दत्त, त्यांचे द्वितीय पुत्र, त्यांच्याविषयी लिहितात, ''गरीबांना सहाय्य करण्याची प्रेरणा त्यांना एखाद्या रोगासमान होती.'' त्यांच्या वस्तीमध्ये ते 'परोपकारी विश्वनाथ' म्हणून प्रख्यात होते. कुणालाही दुःखात पाहिल्यास ते स्वतःला आवरू शकत नसत. ते दूरच्या नातेवाईकांच्या मुलांचा शैक्षणिक खर्च मन-मोकळेपणाने करीत. तसेच शेजाऱ्यांच्या गरीबीचे चटके कमी करण्यासाठी आवाक्याबाहेर जाऊन मदत करीत. दानधर्माच्या कार्यात ते कधीच भेदभाव करीत नसत. काही वेळा अयोग्य लोकांना सुद्धा ते मदत करायचे. नरेंद्रनाथांनी जेव्हा ते पाहिले तेव्हा वडिलांना पैश्याच्या दुरुपयोगासंबंधी विचारले. त्यांचे वडील म्हणाले - ''मुला, हे जीवन दुःखाने अतोनात भरलेले आहे. जेव्हा तू मोठा होशील तेव्हा तुला स्वतःच ह्याची जाणीव होईल आणि सर्वांसाठी तुझ्या मनात दया उत्पन्न होईल.''

श्रीरामकृष्णांच्या जीवन आणि उपदेशांमध्ये नरेंद्रनाथांना ह्या सहानुभूतीची पूर्ण अभिव्यक्ती झाली. त्यांनी (श्रीरामकृष्णांनी) नरेंद्रनाथांच्या स्वाभाविक दयागुणांचे प्रत्येक व्यक्ती आणि वस्तूसाठी प्रेम आणि आदरात रुपांतरित केले. श्रीरामकृष्णांनी शिकविले की मनुष्यावर 'दया' करणे चुकीचे आहे कारण मनुष्य हा मूर्तीमंत ईश्वर आहे. आपण ईश्वरावर दया करतो का? नाही. उलट ईश्वराची सेवा आणि भक्ती करण्याची संधी मिळाल्यास आपण स्वतःला भाग्यवान समजतो. त्यास ईश्वराचा आशीर्वाद मानतो. म्हणून 'दया' शब्द योग्य नाही. मानवता ही देवत्वाची अभिव्यक्ती आहे असे जाणून 'शिवभावे जीव सेवा' हीच अभिवृत्ती असायला हवी. कुणाचाही द्वेष करू नये कारण पापी माणूस पण मुळात ईश्वर

असतो. चोराच्या किंवा असभ्य व्यक्तीच्या तसेच सुसंस्कृत आणि सत्पुरुषांच्या रुपात तोच एक नारायण (ईश्वर) असतो.

अशाप्रकारे स्वामी विवेकानंद आपल्या गुरुंकडून प्रत्येक व्यक्तीला, पतिताला सुद्धा, आदराने वागवायला शिकले. ते म्हणत,'दुष्ट ईश्वर', 'पापी ईश्वर'. ते म्हणत, ''ह्या नरकासमान विश्वात कोणीही एखाद्या व्यक्तीच्या हृदयात एका दिवसापुरता आनंद आणि शांती निर्माण करू शकला तर तेवढेच सत्य आहे. हे मी आजीवन दु:ख सोसून शिकलो.

एकदा स्वामीजींकडे एक उत्तर भारतीय पंडित वेदांताच्या चर्चेत त्यांना हरवण्याच्या हेतूने आले. पण स्वामीजींना काही त्याविषयी चर्चा करायची नव्हती. त्यावेळी ते देशभर पसरलेल्या दुष्काळ पीडित दु:खी जनतेविषयी सतत विचार करीत होते. ते म्हणाले,''पंडितजी, प्रथम सर्वत्र व्याप्त असलेल्या भयंकर दु:खाचे शमन करण्याचा प्रयत्न करू या. अन्नासाठी भुकेल्या देशवासियांचे हृदयद्रावक रडणे थांबवू या. नंतर तुम्ही माझ्याकडे वेदांताची चर्चा करायला या. भुकेने मरत असलेल्या हजारो लोकांचे प्राण वाचविण्यासाठी आपलं तन-मन अर्पण करणे हेच वेदांतधर्माचे सार आहे.''

स्वामीजी मुंबईला जात असताना स्वामी तुरियानंद (हरि महाराज) त्यांचा निरोप घेण्यासाठी अबू रोड स्टेशनवर गेले असता स्वामीजी त्यांना म्हणाले,'' हरि भाई, अजून मी तुमच्या तथाकथित धर्माविषयी काहीही समजू शकलो नाही...'' इतके म्हणताच ते गहिवरून उठले आणि पुढे काहीही बोलू शकले नाही. त्यांचा चेहरा उदास झाला. मग स्वत:ला सावरून, छातीवर हात ठेऊन ते म्हणाले, ''पण माझं हृदय, मर्यादेपलिकडे विस्तृत झाले असून दुसऱ्यांच्या वेदना मी अनुभवू शकतो. खरंच! कुणालाही दु:ख झाल्यास मी अक्षरश: तडफडून उठतो.'' स्वामीजी पुन्हा शोकाने विव्हल झाले आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहू लागले. स्वामी तुरियानंद स्तब्ध झाले. त्यांनी मनात म्हटले,'' भगवान बुद्धांना ह्याच प्रकारचा अनुभव होऊन त्यांनी सुद्धा हेच प्रेमाचे उद्गार काढले होते ना!'' त्यांना स्पष्ट दिसत होते की लाखो लोकांच्या अंतहीन दु:खाने स्वामीजींच्या हृदयात वादळ निर्माण केले होते. त्यांचं हृदय जणू एका विशाल पात्राप्रमाणे होते ज्यात मानवजातीच्या समस्त दु:खांच्या निवारणासाठी मलम तयार होत होते.



१३ एप्रिल १८९० रोजी वाराणसीला असताना, स्वामीजींना त्यांचे गुरुबंधू बलराम बोस ह्यांच्या निधनाची बातमी मिळाली. त्याना मोठा धक्का बसला आणि ते आपले अश्रु आवरू शकले नाही. वाराणसीतील एक प्रख्यात विद्वान, प्रमदादास मित्र ह्यांनी ते पाहिले. ते म्हणाले,''स्वामीजी तुम्ही संन्यासी आहात. तुम्ही असा विलाप करणे योग्य नाही.'' प्रमदादास बाबूंच्या शब्दांनी स्वामीजींना दु:ख झाले. ते म्हणाले,''प्रमदाबाबू, तुम्हाला काय म्हणायचं आहे. हे खरं आहे की मी एक संन्यासी आहे. पण संन्याशाने हृदय-शून्य असणे आवश्यक आहे का?'' ते पुढे म्हणाले,''हे बघा, खरा संन्यासी सामान्यांपेक्षा अधिक कोमल हृदयी असतो. अखेर आपण सर्व मनुष्य आहोत. ह्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे बलराम बाबू माझे गुरुबंधू होते. मला अशाप्रकारचे वैराग्य आवडत नाही ज्यामध्ये मनुष्य भावनाहीन आणि निर्दयी बनतो.''

स्वामीजी नेहमी आपल्या शिष्यांना सांगत की जो दुसऱ्यांसाठी सत्कर्म करण्याचा प्रयत्न करीत नाही त्याला क्वचितच संन्यासी म्हणता येईल. ते नेहमी म्हणत की संन्यासी दुसऱ्यांसाठीच जन्माला येतो, पीडितांना सांत्वना देण्यासाठी, मग ती पुत्र वियोगात शोकाकुल माता असो किंवा दु:खी विधवा असो. मानवाच्या भौतिक दु:खाचे निवारण करण्यासाठी तसेच त्यांच्या आध्यात्मिक गरजा भागवण्यासाठी त्यांच्यातील सुप्त शक्तींना जागरुक करण्यासाठीच त्याचा जन्म असतो.

एकदा हिवाळ्यात स्वामीजी देवघरला स्वामी निरंजनानंदांबरोबर प्रियनाथ मुखर्जींच्या घरी गेले होते. एके दिवशी, आपल्या संन्यासी बंधूंबरोबर फिरायला गेले असता, स्वामीजींनी रस्त्याच्या कडेला एका माणसाला असहायपणे वेदनेने पीडित पाहिले. स्वामीजी त्याच्या जवळ गेले. तो तीव्र अतिसाराने ग्रस्त होता. त्यांच्या लक्षात आले की त्या व्यक्तीला त्वरित औषधोपचाराची गरज आहे. पण प्रथम त्याला तिथून हलवणे आवश्यक होते. पण न्यायचे तरी कुठे? त्यांना प्रियनाथांचे घर आठवले. पण स्वामीजी स्वत: तिथे पाहुणे होते. त्या अनोळख्या व्यक्तीला ते त्यांच्या घरी नेऊ शकत नव्हते. प्रियनाथ बाबू कदाचित नाराज झाले असते. क्षणभर त्यांना संकोच झाला पण मग त्यांनी मनाचा निश्चय केला की कोणत्याही परिस्थितीत त्या मनुष्याची सेवा करायची. स्वामी निरंजनानंदांच्या मदतीने त्यांनी त्या माणसाला प्रियनाथ बाबूंच्या घरी नेले आणि एका खाटेवर

झोपवले. त्याला स्वच्छ केले, चांगले कपडे घातले आणि शेक दिला. स्वामीजींच्या उपचारामुळे तो माणूस लवकर बरा झाला. नाराज होण्याऐवजी प्रियनाथ बाबू स्वामीजींच्या अतुलनीय प्रेमाची अभिव्यक्ती पाहून आनंदित झाले.

अमेरिकन लखपती श्री. जॉन डी. रॉकफेलर यांनी आपल्या मित्रांकडून स्वामीजींविषयी ऐकले होते. त्या विलक्षण भारतीय संन्याशाला रॉकफेलरांनी भेटावे अशी त्यांच्या मित्रांची इच्छा होती. पण ह्या ना त्या सबबीवर त्यांनी ते नाकारले. ते फार दृढनिश्चयी होते आणि त्यांचा निर्णय बदलणे कोणालाही शक्य नव्हते. पण एक दिवस आवेशाने रॉकफेलर शिकागोमध्ये त्यांच्या एका मित्राच्या घरी गेले जिथे स्वामीजी निवास करीत होते. आचाऱ्याने दरवाजा उघडताच त्याला बाजूला सारून हिंदु संन्याशाला भेटण्याचा त्यांनी आग्रह केला. आचारी त्यांना दिवाणखान्यात घेऊन गेला. कोणतीही पूर्वसूचना देण्यापूर्वी रॉकफेलरने स्वामीजींच्या अभ्यासखोलीत प्रवेश केला. टेबलापाशी काहीतरी लिहित बसलेल्या स्वामीजींनी मान वर करून कोणी प्रवेश केला ह्याकडे लक्ष दिले नाही. हे पाहून ते आश्चर्यचकित झाले. काही क्षणानंतर स्वामीजींनी रॉकफेलरना त्यांच्या (रॉकफेलरच्या) भूतकाळाविषयी अशा काही गोष्टी सांगितल्या ज्या त्यांच्याखेरीज इतर कुणालाही माहीत नव्हत्या. मग स्वामीजींनी रॉकफेलर यांना समजावले की जो पैसा त्यांनी संचित केला होता तो त्यांचा नव्हताच. ते फक्त एक माध्यम असून जगाचे कल्याण करणे त्यांचे कर्तव्य होते. लोकांना मदत करण्याची संधी मिळावी म्हणूनच देवाने त्यांना धन संपत्ती दिली होती. आपल्याशी कोणी अशा प्रकारे बोलण्याचे धाडस करू शकते ह्या विचाराने रॉकफेलर संतप्त झाले आणि निरोप घेतल्याशिवाय रागाने खोलीबाहेर पडले. पण एका आठवड्यानंतर पूर्वीप्रमाणे पूर्वसूचना दिल्याशिवाय ते स्वामीजींच्या अध्ययन कक्षात शिरले आणि त्यांना पहिल्याप्रमाणे पाहून त्यांच्या टेबलावर एक कागद फेकला ज्यामध्ये एका सार्वजनिक संस्थेला आर्थिक मदत करण्याच्या त्यांच्या योजनेबद्दल माहिती होती. ''हे बघा'', ते म्हणाले, ''आता तुमचे समाधान झाले असेल. तुम्ही माझे आभार मानले पाहिजेत.'' स्वामीजींनी नजर वर करून पाहिले नाही आणि जागचे हलले देखील नाहीत. मग कागद हातात घेऊन शांतपणे वाचला आणि म्हणाले, ''खरं तर तुम्हीच माझे आभार मानायला हवेत.'' ही रॉकफेलरची सार्वजनिक कल्याणकार्यासाठी दिलेली सर्वप्रथम मोठी देणगी होती. कालांतराने ते आपल्या लोकोपकारासाठी प्रसिद्ध झाले.



स्वामीजी काशीपूर येथे गोपाल लाल सीलच्या उद्यानगृहात राहत असताना एक दिवस एक तरुण त्यांच्याकडे आला आणि म्हणाला, ''मी पुष्कळ ठिकाणी हिंडलो आणि अनेक धार्मिक पंथांशी माझा निकट संबंध आलेला आहे. तरीही अजून सत्य काय हे मला कळलेले नाही. मी दररोज दार बंद करून ध्यानाला बसतो पण शांती काही लाभली नाही. स्वामीजी, असे का?''

स्वामीजींनी शांतपणे त्याचे म्हणणे ऐकले. मग ते म्हणाले, ''बाळा, तुला जर शांती हवी असेल तर आजवर तू जे करत आलास त्याच्या अगदी विरूद्ध करावे लागेल. तुला तुझे दार उघडे ठेवून सर्वत्र पाहावे लागेल. असे केल्यास, तुला आश्चर्य वाटेल की किती लोक तुझ्या मदतीची आतुरतेने वाट पाहत आहेत. त्यांना मदत कर. त्यांना अन्न दे, पाणी पाज. शक्य असेल तितकी सेवा कर. मी खात्रीपूर्वक सांगतो, तुला शांती मिळेल.

मराठी सिनियर (इयत्ता ८ ते १०)
विशेष सूचना :
१.प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.
२. कृपया विषयास धरून बोलावे.
३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :
(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण

## सार्वजनीन धर्माचा आदर्श

आपल्या इंद्रियांचे जेवढे म्हणून क्षेत्र आहे किंवा आपले मन ज्या गोष्टींची कल्पना करू शकते त्या सर्व क्षेत्रात व गोष्टीत दोन शक्तींच्या क्रिया-प्रतिक्रिया चालू असलेल्या आपल्याला आढळून येतात. ह्या दोन शक्ती परस्परांना विरोध करीत असतात आणि त्यामधून बाह्य जगतात आपल्याला सतत दिसणाऱ्या आणि अंतर्जगतात आपल्या सतत अनुभवास येणाऱ्या सगळ्या संमिश्र स्वरुपाच्या घटना निर्माण होत असतात. बाह्य जगतामध्ये या विरोधी शक्तींचे कार्य आकर्षण व अपसारण या स्वरुपात व्यक्त होत असते. याच दोन्ही शक्ती आपल्या अंतर्जगतात प्रेम व द्वेष किंवा शुभ व अशुभ अशा स्वरुपात व्यक्त होत असतात. काही वस्तू आपण आपल्यापासून दूर ढकलीत असतो तर काही वस्तू आपण आपल्याकडे ओढून घेत असतो. आपण काही वस्तूंकडे आकर्षिले जातो, तर काही वस्तूंपासून आपल्याला दूर जावेसे वाटते. आपल्या जीवनात अनेक वेळा आपल्याला असे आढळून येते की काही व्यक्तींबद्दल जणु काही अकारण आकर्षण आपल्याला वाटते. त्याचप्रमाणे कित्येक वेळा दुसऱ्या काही व्यक्तींबद्दल आपल्याला अकारण तिटकारा वाटतो. ही गोष्ट सर्वांच्या नित्य परिचयाची आहे. आणि या शक्तीचे कार्यक्षेत्र जितके उच्च असेल तितका या विरोधी शक्तींचा परिणाम तीव्र व डोळ्यांत भरण्यासारखा असतो.

मानवी जीवनाचे व विचाराचे सर्वोच्च क्षेत्र धर्म हेच होय. आणि या ठिकाणीच ह्या दोन शक्तींचे कार्य अत्यंत स्पष्टपणे दिसून येते. मानवाला ज्ञात असलेले पराकाष्ठेचे प्रेम धर्मातून उद्‌भवलेले आहे. त्याचप्रमाणे मानवाला माहीत असलेला अती असुरी द्वेषही धर्मातूनच उत्पन्न झालेला आहे. जगाने ऐकलेले शांती देणारे सर्वोत्कृष्ट शब्द धर्माच्या राज्यातील थोर पुरुषांच्या मुखातून बाहेर पडलेले आहेत. त्याचप्रमाणे जगाला ठाऊक असलेली अत्यंत कटु निंदा



नालस्तीही धर्माच्या राज्यातील लोकांच्या तोंडून निघालेली आहे. धर्माचे उद्दिष्ट जितके अधिक श्रेष्ठ, त्याची संघटना जितकी अधिक व्यवस्थित, तितके त्याचे कार्य अधिक नजरेत भरण्यासारखे असते. धर्माच्या प्रेरणेमुळे या जगात जितके रक्ताचे पाट वाहिले आहेत तितके मानवाच्या दुसऱ्या कोणत्याही प्रेरणेमुळे वाहिलेले नाहीत. याबरोबरच धर्माने जितकी रूग्णालये व गरीबांसाठी जितकी आश्रयस्थाने निर्माण केली आहेत तितकी दुसऱ्या कुणी निर्माण केली नाहीत. मानवजातीचेच नव्हे, तर अत्यंत कनिष्ठ पशूंचीही काळजी वाहण्याची वृत्ती धर्मामधूनच निर्माण झालेली आहे, दुसऱ्या कशामधून नाही.

धर्माने मनुष्य जितका निष्ठुर बनतो तितका दुसऱ्या कशानेही नाही आणि धर्माने मनुष्य जितका कोमल बनतो तितका दुसऱ्या कशानेही नाही. ही गोष्ट भूतकालापासून चालत आलेली आहे आणि भविष्यकालातही प्राय: ती तशीच चालू राहील. तरी पण धर्माधर्मामधील, पंथापंथांमधील संघर्षातून निर्माण झालेल्या कोलाहल, कलह, ईर्ष्या, द्वेष या सर्वांमधून वेळोवेळी अशी वज्रगंभीर वाणी निघाली आहे की जिने हा सर्व कोलाहल बुडवून टाकून शांतीची व समन्वयाची घोषणा केली आहे. समग्र जगताने ही घोषणा ऐकली आहे. हा समन्वय व ही शांती कधी प्रस्थापित होतील का ?

महान संघर्ष असलेल्या ह्या धर्माच्या क्षेत्रात अखंड समन्वय स्थापन होणे कधी शक्य आहे का? या शतकाच्या उत्तरार्धात समन्वयाच्या या प्रश्नाचा जग फार गंभीरपणे विचार करीत आहे. विचारवंत माणसे सामाजिक जीवनात हा समन्वय आणण्यासाठी निरनिराळ्या योजना सुचवीत आहेत आणि त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक प्रयत्न सुरू आहेत. परंतु ही गोष्ट किती कठीण आहे हे आपल्याला माहीत आहे. जीवनकलहाची तीव्रता कमी करणे, मानवाच्या मनावरील भयंकर ताण कमी करणे हे जवळजवळ अशक्य आहे असे लोकांना आढळून येते. मानवी जीवनाचे जे बाह्य अधिभौतिक क्षेत्र आहे त्यात शांती व समन्वय स्थापन करणे जर इतके कठीण आहे तर मानवाच्या अंतर्जगतात – आध्यात्मिक जगतात – शांती व समन्वय प्रस्थापित करणे हजारो पटीने कठीण आहे यात शंका नाही.

शाब्दिक जंजाळातून थोडा वेळ आपण बाहेर पडावे असे माझे आपणास सांगणे आहे. आपल्या अगदी लहानपणापासून आपण प्रेम, शांती, उदारता,

समता व विश्वबंधुत्व या गोष्टी ऐकत आलो आहोत, पण केवळ शब्दांव्यतिरिक्त त्यांना काही अर्थ उरलेला नसून आपण नुसती पोपटपंची चालविलेली आहे; आणि असे करणे हा आपला स्वभावच बनून गेला आहे. तसे केल्याशिवाय आपल्याला राहवत नाही. ज्या महापुरुषांनी आपल्या हृदयांत या उदात्त भाव-भावना प्रथम अनुभवल्या, त्यांनी त्या व्यक्त करण्यासाठी हे शब्द वापरले, आणि त्या काळी अनेकांना त्यांचा अर्थही समजला. कालान्तराने अज्ञानी लोकांनी हे शब्द घेऊन त्यांचा खेळ करण्यास सुरुवात केली आणि धर्माला केवळ शाब्दिक कसरतीचे रूप दिले. धर्म ही प्रत्यक्ष आचरणात आणण्याची गोष्ट राहिली नाही. अशा रीतीने धर्माला 'घराण्याचा धर्म', 'जातीचा धर्म', 'देशाचा धर्म' अशासारखे स्वरुप आले.

विश्वबंधुत्वाविषयी आपण बरेच ऐकतो. आणि विशेषत: या विश्वबंधुत्वाची शिकवण देण्यासाठी ज्या अनेक संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत, त्यांच्याविषयीसुद्धा आपण बरेच ऐकतो. मला एक फार जुनी गोष्ट आठवते. भारतामध्ये मद्यपान ही फार वाईट गोष्ट मानलेली आहे. दोन भाऊ होते. त्यांना एका रात्री चोरून दारू पिण्याची इच्छा झाली. त्यांचा एक सनातनी वृत्तीचा चुलता होता व तो शेजारच्याच खोलीत झोपलेला होता. प्रत्यक्ष मद्यपानाला सुरुवात करण्यापूर्वी ते एकमेकांना म्हणाले की आपण खूप शांतता राखली पाहिजे, नाही तर आपले काका जागे होतील. दारू पीत असताना, ''शांत राहा, काका जागे होतील'' असे ते एकमेकांना शांत करण्यासाठी चढत्या आवाजात पुन:पुन: म्हणू लागले. आणि त्यांची ही आरडाओरड वाढताच त्यांचे काका जागे होऊन खोलीत आले व त्यांना सर्व हकीकत कळली. आपण सर्वजण या दारुबाजांप्रमाणे टाहो फोडतो की 'विश्वबंधुत्व हवे! आपण सर्व समान आहोत; म्हणून आपण आपला एक पंथ स्थापू या.' आणि एखाद्या पंथाची स्थापना केल्यानेच आपण समतेच्या विरूद्ध वागतो आणि समता नाहीशी होते.

अशा रीतीने आपण विश्वबंधुत्व व समता यांचा या जगात शोध चालविलेला आहे. जेव्हा तुम्ही विश्वबंधुत्व व समता यांविषयी कुणाला बोलताना ऐकाल, तेव्हा तुम्ही थोडे थांबा व सावध राहा असे तुम्हाला माझे सांगणे आहे, कारण असल्या बोलण्यामागे प्राय: कमालीचा स्वार्थ दडलेला असतो. ''हिवाळ्यात कधी कधी आकाशात ढग जमतात, मेघगर्जना होते, पण पाऊस मात्र पडत नाही. पण वर्षाऋतूत मेघगर्जना न होता मुसळधार पाऊस पडतो.''



याचप्रमाणे जे खरे कार्यकर्ते असतात व ज्यांच्या अंत:करणात विश्वबंधुत्वाची जाणीव खरोखरच निर्माण झालेली आहे, असे लोक लंब्याचवड्या गोष्टी करीत नाहीत, ते विश्वबंधुत्वाच्या नावाखाली पंथ-उपपंथांची स्थापना करीत नाहीत. परंतु त्यांच्या कृती, त्यांची वागणूक, त्यांचे एकंदर जीवन असे असते की त्यावरून सर्व मानवाविषयी त्यांना किती प्रेम व सहानुभूती आहे, सर्व मानवजातीविषयी बंधुत्वाची भावना त्यांच्या ठिकाणी किती सत्यत्वाने वास करीत आहे याची आपल्याला स्पष्ट कल्पना येते. असे लोक बोलत नाहीत, प्रत्यक्ष कृती करतात व तसे जीवन जगतात. हे जग वाचाळ लोकांनी भरलेले आहे. आज आपल्याला पोकळ भाषणांपेक्षा प्रामाणिक कार्याची अधिक गरज आहे.

आतापर्यंत धर्माच्या बाबतीत सार्वजनीन असा भाग शोधून काढणे किती कठीण आहे हे आपण पाहिले. तथापि धर्माची अशी बाजू आहे हेही आपण जाणतो. आपण सर्व माणसे आहोत, पण आपण सर्वजण समान आहोत काय? निश्चितच नाही. कोण म्हणतो की आपण सर्वजण समान आहोत? फक्त खुळी माणसेच असे म्हणू शकतील. आपली बुद्धी, आपली शक्ती व आपली शरीररचना ही सारखी आहे काय? एक मनुष्य दुसऱ्यापेक्षा अधिक सशक्त आहे, एकापेक्षा दुसरा अधिक बुद्धीमान आहे. जर आपण सर्वजण समान असतो तर ही विषमता का असावी? कोणी ही निर्माण केली? - आम्हीच. क्षमता, बुद्धी व शारीरिक बल यांच्यात कमी-अधिकपणा असल्यामुळेच आमच्यामधील ही विषमता निर्माण झाली. असे असूनही समतेचे तत्त्व आपल्याला अत्यंत आवडते हे आपल्याला माहीत आहे. आपण सर्व मानव आहोत, पण आपल्यापैकी काही पुरुष आहेत तर काही स्त्रिया आहेत. कुणी काळा आहे, तर कुणी गोरा आहे. पण ही सर्व माणसेच आहेत, हे सर्वजण मानवजातीतच अंतर्भूत आहेत. आपले चेहरे भिन्न आहेत. सारख्या चेहऱ्याच्या दोन व्यक्ती कधीच दिसत नाहीत. तरीपण आपण सर्वजण माणसेच आहोत. सर्वांमध्ये वसत असणारे हे मानवत्व कुठे आहे? मला दिसणारे स्त्री-पुरुष काळे किंवा गोरे असतील, पण त्या सर्वांमध्ये सगळ्यांना सामान्य असणारे मानवत्व वसत आहे हे मला माहित आहे. ते धरण्याचा, ते अनुभवण्याचा आणि ते प्रत्यक्ष रुपात पाहण्याचा प्रयत्न केल्यास मला ते गवसत नसेल, पण ते आहे याबद्दल माझी खात्री आहे. जर कोणत्या एखाद्या गोष्टीच्या अस्तित्वाची मला खात्री असेल तर ती सर्वांमध्ये सामान्यपणे वसत असलेल्या मानवत्वाची होय. सार्वजनीन धर्माचेही असेच आहे. ईश्वराच्या रूपाने तो सर्व धर्मांमध्ये अनुस्यूत

आहे. अनंत काळापासून तो अस्तित्वात आहे व अनंत काळ तो अस्तित्वात राहील. भगवान म्हणतात, ''या सर्व मण्यांमधून जाणारा मी दोरा आहे.'' आणि प्रत्येक मणी हा एक धर्म वा धर्मपंथ आहे. असे हे विविध मणी असून ईश्वर म्हणजे त्या सर्वांमधून जाणारे किंवा त्यांना गोवणारे एक सूत्र आहे. पण दु:खाची गोष्ट ही की बहुसंख्य लोकांना याची मुळीच जाणीव नाही.

विविधतेत एकता हा सृष्टीचा नियम आहे. आपण सर्व माणसे असलो तरी परस्परांपासून पृथक् आहोत. मानव म्हणून तुम्ही इतर पशूंपासून निराळे आहात. पण सजीव वस्तु या दृष्टीने पुरुष, स्त्री, पशु, वनस्पती सर्व एकच होत. आणि 'सत्ता' या दृष्टीने तुम्ही सर्व विश्वाशी एकरूप आहात. ती विश्वव्यापक विराट सत्ता म्हणजे ईश्वर होय आणि त्याच्या ठिकाणी आपण सारे एक आहोत. पण ह्या व्यक्त सृष्टीत विविधता व भिन्नता कायम राहणारच. आपल्या कर्मात वा आपल्या शक्तीच्या बाह्य आविष्कारात भिन्नता कायम राहणारच. म्हणून एकाच प्रकारच्या धर्ममतांवर अखिल मानवजातीने विश्वास ठेवावा अशी जर सार्वजनीन धर्माविषयी आपली कल्पना असेल तर ही गोष्ट पूर्णपणे अशक्य आहे हे आता आपल्या लक्षात येईल. ही गोष्ट कदापि शक्य नाही. सर्व चेहरे सारखे असतील असा काळ कधीही येणार नाही. त्याचप्रमाणे एकच तत्व सर्वमान्य होईल अशी जर आपली अपेक्षा असेल तर तीही फोल आहे. असे होणे कधीही शक्य नाही. त्याचप्रमाणे सर्व जगात एकच अनुष्ठानपद्धती असणे शक्य नाही. अशी परिस्थिति कधीच अस्तित्वात येणार नाही. आणि यदाकदाचित जर तशी परिस्थिती निर्माण झाली तर जगाचा लोप झाल्याशिवाय राहणार नाही, कारण विविधता हेच जीवनाचे आदितत्व आहे. आपल्याला विशिष्ट रूपे कशी प्राप्त झाली? भिन्नत्वामुळे. संपूर्ण समानता झाल्यास आपला विनाश होईल.

या विश्वात गती कशी उत्पन्न होते? समतोल नष्ट झाल्यामुळे? हे विश्व नष्ट झाल्याशिवाय पूर्ण समानता व एकता उत्पन्न होणार नाही. त्याशिवाय ही गोष्ट अशक्यच आहे. इतकेच नव्हे तर अशा प्रकारची समत्वरूपी एकता प्रस्थापित होणे हे धोक्याचे आहे. आपण सर्वांनी एकाच प्रकारे विचार करावा अशी इच्छा आपण बाळगू नये. तसे झाल्यास विचार करायला विषयच मुळी ठरणार नाही. पदार्थ संग्रहालयात ठेवलेल्या इजिप्त देशातील 'ममी' प्रमाणे आपण सर्वजण समान होऊन जाऊ, एकमेकांकडे नुसते पाहत राहू आणि कोणत्याही प्रकारचा विचार



आपल्या मनात उठणार नाही. हा भेद, ही भिन्नता, हा समानतेचा अभाव हाच आपल्या साऱ्या प्रगतीचा आत्मा आहे आणि हाच आपल्या विचाराचे मूळ आहे आणि ही विविधता सर्वदा राहिलीच पाहिजे.

मग मी सार्वजनीन धर्माचा आदर्श कशाला म्हणतो ? जगातील सर्व माणसे मानतील असे एखादे सार्वजनीन तत्त्वज्ञान, किंवा एखादे सार्वजनीन पुराण किंवा एखादी सार्वजनीन अनुष्ठानपद्धती असा मी सार्वजनीन धर्माचा अर्थ करीत नाही; कारण मला माहीत आहे की हे गुंतागुंतीचे, विचित्र रचनेचे व अत्यंत आश्चर्यकारक असे जे विश्वरूपी यंत्र आहे ते असेच चालू राहणार आहे. मग आपल्याला या ठिकाणी काय करता येईल? विश्वाचे हे यंत्र आपल्याला सुरळीतपणे चालविता येईल, त्यातील घर्षण कमी करता येईल, त्यातील चक्रामध्ये वंगण घालता येईल. ते कसे? - तर भिन्नतेची स्वाभाविक आवश्यकता मान्य करून. ज्याप्रमाणे आपण स्वभावत: एकत्व स्वीकारले त्याप्रमाणेच विविधतेलाही आपण मान्यता दिली पाहिजे. एकच सत्य हजारो मार्गांनी व्यक्त होऊ शकते आणि त्यातील प्रत्येक मार्ग हा आपल्याकरिता सारखाच सत्य असू शकतो ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे.

एकाच वस्तूकडे आपल्याला हजारो दृष्टींने पाहता येते, आणि कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी वस्तू मात्र तीच असते हे आपण जाणले पाहिजे. सूर्याचे उदाहरण घ्या. कल्पना करा की या पृथ्वीवरील एक मनुष्य सूर्योदयाच्या वेळी सूर्याकडे पाहत आहे. सूर्य त्याला एका मोठ्या गोलासारखा दिसतो. आता कल्पना करा की तोच मनुष्य सूर्याकडे प्रवास करीत आहे, त्याने आपल्याबरोबर कॅमेरा घेतलेला आहे, प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यात त्याने सूर्याची छायाचित्रे घेतलेली आहेत, आणि शेवटी तो प्रत्यक्ष सूर्यावर पोहोचलेला आहे. प्रत्येक टप्प्यावरील सूर्याचे छायाचित्र दुसऱ्या टप्प्यावरील छायाचित्रापेक्षा भिन्न असणार, आणि जेव्हा तो परत येईल तेव्हा आपल्याला वाटेल की त्याच्याजवळ निरनिराळ्या सूर्याची निरनिराळी छायाचित्रे आहेत. पण आपल्याला हे माहीत आहे की त्या माणसाने प्रवासाच्या विभिन्न टप्प्यामध्ये ही छायाचित्रे घेतलेली असून ती सर्व त्या एकाच सूर्याची आहेत. ईश्वराच्या बाबतीतदेखील असेच घडते. उच्च वा कनिष्ठ तत्वज्ञान, उदात्त वा निकृष्ट पद्धती, सुसंस्कृत धार्मिक विधी वा रानटी लोक करतात तसली मूर्तीपूजा या सर्वांच्या सहाय्याने प्रत्येक धर्मपंथ, प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक धर्म जाणीवपूर्वक किंवा अजाणता ईश्वराप्रत जाण्याचा मार्ग आक्रमित असतो.

मानवाला लाभलेल्या सत्याचा प्रत्येक अनुभव हा त्या ईश्वराचेच दर्शन असते, दुसऱ्या कशाचेच नव्हे.

कल्पना करा की आपण हातात भांडी घेऊन पाणी आणण्यासाठी एखाद्या तलावावर गेलो. एकाजवळ प्याला आहे, दुसऱ्याजवळ घागर आहे, तिसऱ्याजवळ बादली आहे आणि चवथ्याजवळ दुसरे काहीतरी आहे. आपण सर्वजण आपापली भांडी भरून घेतो. आपल्यापैकी प्रत्येकाजवळ जे भांडे असेल त्या भांड्याचा आकार प्रत्येकाने भरून घेतलेल्या पाण्याला येणार हे उघड आहे. ज्याच्याजवळ प्याला असेल त्याच्या पाण्याला प्यालाचा आकार येणार. ज्याने घागर आणली असेल त्याच्याजवळच्या पाण्याला घागरीचा आकार येणार. हीच गोष्ट इतर भांड्यांनाही लागू आहे. पण प्रत्येकाच्या भांड्यात पाणीच असते, त्याव्यतिरिक्त दुसरे काहीच नसते. धर्माच्या बाबतीतदेखील हीच गोष्ट खरी आहे. आपली मने ह्या भांड्यांसारखी आहेत, आणि आपल्यापैकी प्रत्येकजण ईश्वरी साक्षात्काराच्या लाभासाठी प्रयत्न करीत आहे. ही निरनिराळी भांडी भरणाऱ्या पाण्याप्रमाणे ईश्वराचे स्वरूप आहे आणि प्रत्येक भांड्यामध्ये त्या भांड्याच्या आकारानुरूप ईश्वराचे दर्शन होते. असे असले तरी ईश्वर एकच आहे. प्रत्येकाला त्या एकाच ईश्वराचा अनुभव येत असतो. धर्माच्या बाबतीत असलेली सार्वजनीनता याच स्वरूपात आपल्याला दिसून येऊ शकते.

तात्त्विक दृष्ट्या विचार केला तर ही गोष्ट ठीकच आहे. पण खरा प्रश्न असा आहे की निरनिराळ्या धर्मातील हा समन्वय प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचा काही मार्ग उपलब्ध आहे काय?सर्व धर्ममते खरी आहेत ही गोष्ट फार प्राचीन काळापासून मान्य झालेली आहे असे आपल्याला आढळून येते. भारत, अलेक्झांड्रीया, युरोप, चीन, जपान, तिबेट आणि शेवटी अमेरिका या सर्व देशात ज्यायोगे सर्व धर्म प्रेमाने एकत्र नांदतील असा सर्वसंमत धर्म स्थापन करण्याचे शेकडो प्रयत्न आतापर्यंत झालेले आहेत. परंतु व्यावहारिक योजनेच्या अभावी ते सर्व अयशस्वी झालेले आहेत. जगातील सर्व धर्म खरे आहेत ही गोष्ट पुष्कळांनी मान्य केलेली आहे. पण या सर्व धर्मांच्या संगमामध्ये प्रत्येक धर्म स्वत:चे वैशिष्ट्य कायम राखील अशा तऱ्हेने सर्व धर्म एकत्रित आणण्याचा व्यवहार्य मार्ग कोणीही दाखविलेला नाही. कोणत्याही धर्माच्या अनुयायाचे व्यक्तिवैशिष्ट्य अबाधित राखून त्याला दुसऱ्या धर्माशी कसे एकजीव होता येईल हे दाखविणारी जी योजना पुढे येईल तीच व्यवहार्य ठरेल. पण आतापर्यंत सर्व धर्मांमध्ये एकवाक्यता निर्माण करण्याचे जे



प्रयत्न झाले त्या सर्वांमध्ये, सर्व धर्म सत्य आहेत हा सिद्धान्त मान्य झालेला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र या धर्मांना काही विशिष्ट मतात जखडून ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि परिणामी परस्परांशी विरोध करणारे, व वरचढ होण्याचा प्रयत्न करणारे असे आणखी काही नवे पंथ निर्माण झाले.

प्रथमत: सर्व मानवजातीला मला असे आवर्जून सांगावयाचे आहे की **'विनाश करू नका'** या तत्त्वावर निष्ठा ठेवा. तुम्हाला शक्य असेल ती मदत करा. नाही तर हात जोडून बाजूला उभे रहा आणि जे काही घडत आहे ते घडू द्या. तुम्हाला दुसऱ्याला मदत करता येत नसली तरी निदान दुसऱ्याचे अनिष्ट करू नका.

मराठी सिनियर (इयत्ता ८ ते १०)
विशेष सूचना :
१.प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.
२. कृपया विषयास धरून बोलावे.
३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :
(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण

## आपल्या मातृभूमीप्रती आपले कर्तव्य

या भारताचा नाश होईल का? तसे झाल्यास जगातील सारी आध्यात्मिकता अस्तास जाईल, नीतीचे सर्व महान आदर्श लयास जातील, धर्माविषयीचा मधुर सहानुभूतीचा भाव नाहीसा होईल, आदर्शनिष्ठा पार निमाल्यासारखी होईल. भारताच्या अस्तित्वाचा असा लोप होईल काय? उदात्ततेचे, नीतिमत्तेचे, आध्यात्मिकतेचे प्राचीन आदिपीठ जो भारत, त्याच्या अस्तित्वाचा असा लोप होईल का? शतसहस्त्र ऋषीमुनींच्या पावन पदरेणूंना वक्षावर धारण करून धन्य झालेल्या आपल्या भारताचा लोप होईल का? देवतुल्य साधुसंतांचे अजूनही प्रिय निवासस्थान असलेल्या भारताचा लोप होईल का? त्या ग्रीक डायोजिनिसचा कंदील हाती घेऊन, बंधूंनो, ह्या विशाल पृथ्वीच्या पाठीवरील शहराशहरातून, खेड्याखेड्यातून, जंगलाजंगलातून धांडोळा घेत तुमच्या मागोमाग येण्यास मी एका पायावर तयार आहे - दाखवा मला असली दुसरी एखादी भूमी की जिथे असे महापुरूष विचरण करीत असतात.

आपल्या या मायभूमीचे जगावर अपार ऋण आहे. देशादेशांची तुलना करून बघितली तर आढळून येईल की जग ह्या सोशिक, सहनशील, सौम्य भारतीयांचे जितके ऋणी आहे तितके आणखी दुसऱ्या कोणत्याही जातीचे नाही... जेव्हा ग्रीस अस्तित्वात देखील नव्हता, रोम अजून जन्मास यावयाचे होते, ज्या वेळी आधुनिक युरोपियनांचे पूर्वज जर्मनीच्या घनदाट जंगलात असभ्य दशेत खितपत निळ्या रंगाने आपली अंगे रंगवीत असत तेव्हाही - त्याकाळीही भारत क्रियाशील होता, त्याचा अमोघ पुरावा आहे. याहीपेक्षा प्राचीन कालापासून - इतिहासाला ज्या काळाची काही माहिती नाही, दंतकथाही ज्या काळाच्या घनांधकाराचा भेद करू शकत नाहीत, त्या प्राचीन कालापासून वर्तमान कालापर्यंत कल्पनांमागून



कल्पना, सिद्धांतांमागून सिद्धांत, विचारांमागून विचार या भारतातून बाहेर गेले आहेत. परंतु त्यातील प्रत्येकाच्या पुढे शांती आणि मागे आशीर्वाणी होती.

भारताने सर्व आर्य राष्ट्रांच्या मागे का पडावे ह्याची मीमांसा तुम्ही कशी करता? भारताजवळ बुद्धी कमी आहे का? का तो कौशल्यहीन आहे? भारताची कला, त्याचे गणित, त्याचे तत्त्वज्ञान हे सर्व पाहून त्याला तुम्ही कोणत्या बाबतीत कनिष्ठ मानू शकाल काय? भारताच्या पक्षी एकच गोष्ट आवश्यक आहे, आणि ती म्हणजे त्याने आपली मोहनिद्रा टाकली पाहिजे. युगानयुगाच्या झोपेतून त्याने जागे झाले पाहिजे व जगातील राष्ट्रांच्या मालिकेत आपले योग्य स्थान प्राप्त करून घेतले पाहिजे. त्याग आणि सेवा हेच भारताचे राष्ट्रीय आदर्श आहेत. भारताने हे दोन आदर्श उत्कटपणे आपल्या जीवनात आणावे म्हणजे बाकी सगळ्या इष्ट गोष्टी आपोआप घडून येतील.

हे देवांच्या संतानांनो, माझ्या देशबांधवांनो, आपल्या राष्ट्राचे हे जहाज युगानुयुगे सभ्यतेचा सर्वत्र प्रसार करण्याचे कार्य करीत आले आहे व त्याने आपल्या अमूल्य रत्नभांडाराने अखिल जगाला समृद्ध केले आहे. गौरवाने भरलेल्या कित्येक शतकांपासून आपल्या राष्ट्ररूपी जहाजाने लक्षावधी जीवांना सर्व दु:खातून पार करून जीवन सागराच्या पैलतीरी पोहोचविले आहे. पण आज त्यात एखादे छिद्र पडून ते आपल्याच दोषामुळे वा अन्य एखाद्या कारणामुळे नादुरुस्त झाले आहे. अशा वेळी त्यातून प्रवास करणाऱ्या तुम्हा लोकांचे कर्तव्य काय आहे? तुम्ही त्याला शिव्या शाप देत बसाल काय व आपापसांत भांडत राहाल काय? तुम्ही सर्वजण एक होऊन व आपल्या सर्व प्रयत्नांची शर्थ करून ही छिद्रे बुजविणार नाही का? आपण सर्वचजण आपल्या हृदयातील रक्त या कार्यासाठी आनंदाने अर्पण करू या; आणि जर या प्रयत्नात आपण अयशस्वी झालो तर आपण सर्वजण एकत्रच बुडू व नष्ट होऊ या, असे झाले तरी आपल्या ओठांवर कृतज्ञतेचे शब्द असोत, निंदेचे शब्द नसोत.

कित्येक गोष्टी अद्याप करावयाच्या आहेत, परंतु आवश्यक त्या साधनांचा ह्या देशांत अभाव आहे. आपल्यापाशी बुद्धिमत्ता आहे, पण कर्मशीलता नाही. आपल्यापाशी वेदान्त तत्वज्ञान आहे, परंतु ते व्यवहारात उतरविण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही. आपल्या धर्मग्रंथातून वैश्विक समतेचा सिद्धांत प्रतिपादिलेला

आहे. परंतु प्रत्यक्ष कार्यात आपण पुष्कळच भेदाभेद पाळतो. ह्याच भारतात अत्युच्च प्रकारच्या नि:स्पृह आणि नि:स्वार्थ कार्याचा महिमा उपदेशिला गेला, परंतु प्रत्यक्ष व्यवहारात आपण भारतीय अत्यंत निर्घृण, अत्यंत निर्दय बनतो - व्यवहारात आपल्या रक्तामांसाच्या शरीरापलिकडे आपण विचारच करू शकत नाही... माझी अशी श्रद्धा आहे की, स्वत:चे पूर्वकालीन वैभव गमावून बसलेल्या, दुर्भागी, विवेकहीन, पददलित, भुकेने वखवखलेल्या, तंटेखोर आणि मत्सरी अशा ह्या भारतीयांवर जर कोणी हृदयापासून प्रेम करू लागला तर भारत पुन: जागा होईल. दारिद्र्य आणि अज्ञान ह्यांच्या भोवऱ्यात सापडून जे दिवसेंदिवस अधिकाधिक बुडत आहेत अशा आपल्या कोट्यावधी देशबांधवांचे कल्याण व्हावे अशी तळमळ असणारे व त्यासाठी यावच्छक्य प्रयत्न करणारे मोठ्या मनाचे शेकडो स्त्री-पुरूष जेव्हा जीवनातील सुखविलास उपभोगण्याच्या साऱ्या इच्छा टाकून देऊन कार्यरत होतील तेव्हाच भारतात जागृती घडून येईल.

सर्वसामान्य जनतेची उपेक्षा हे मी घोर राष्ट्रीय पाप मानतो. आपल्या अवनतीचे ते एक कारण आहे. भारतातील सर्वसामान्य जनतेला पुन्हा जोपर्यंत चांगले शिक्षण प्राप्त होत नाही, तिच्या खाण्यापिण्याची व अन्य गोष्टींची जोपर्यंत नीट काळजी घेतली जात नाही तोपर्यंत आपण कितीही राजकारण केले तरी त्यापासून काहीही लाभ होणार नाही. आपल्याला जर भारताचे पुनरुत्थान घडवून आणावयाचे असेल तर आपण त्याच्यासाठी काम केले पाहिजे.

वत्सांनो, दु:खी, गरीब, अज्ञानी यांच्यासाठी इतकी तळमळ वाटू द्या, हृदय इतके व्याकुळ होऊ द्या, मनप्राण इतके पिळवटून निघू द्या, की त्यामुळे हृदय बंद पडण्याची वेळ येईल आणि डोकं असे गरगरायला लागेल की वेड लागते की काय असे तुम्हाला वाटू लागेल. मग आपल्या अंतरात्म्याच्या वेदना भगवंताच्या पादपद्मी निवेदन करा. तेव्हाच ते तुम्हाला शक्ती, सहाय्य व अदम्य उत्साह देतील. गेली दहा वर्षे माझा एकच मूलमंत्र होता - झुंजा..झुंजून पुढे व्हा. आजही मी पुन्हा तेच म्हणतो - झुंजा, झुंजत झुंजत पुढे व्हा. जेव्हा दशदिशा निराशेच्या अंधकाराने भरून गेल्या होत्या तेव्हा मी म्हणत होतो झुंजत पुढे चला. आज आशेच्या प्रकाशाने दशदिशा किंचित उजळल्या असताना देखील माझा तोच एक मंत्र आहे - चला, झुंजत झुंजत पुढे चला. वत्सांनो, भिऊ नका.

नांगर धरणाऱ्या शेतकऱ्याच्या झोपडीतून नवा भारतवर्ष उभा होऊ द्या.



कोळ्याच्या, चांभाराच्या, भंग्याच्या झोपड्यांतून नवा भारतवर्ष उभा होऊ द्या. किराणामालाच्या दुकानातून आणि भडभुंजांच्या भट्टीजवळून तो वर येऊ द्या. कारखान्यांमधून, दुकानातून आणि बाजारातून तो वर येऊ द्या. झाडाझुडपांतून, रानावनातून, दऱ्याखोऱ्यातून, पहाडपर्वतांतून तो प्रकट होऊ द्या.

आज आम्हाला, सर्वस्वावर पाणी सोडून देशासाठी जीवन समर्पित करणारे काही तरूण हवे आहेत. प्रथम त्यांच्या जीवनाला वळण लावावे लागेल, काही आकार द्यावा लागेल, मगच त्यांच्याकडून खऱ्याखऱ्या कार्याची अपेक्षा करणे उचित ठरेल. तरूण पीढीवर, उगवत्या पीढीवर माझा विश्वास आहे. त्यांच्यामधूनच माझे कार्यकर्ते निघतील. सिंहासारखा पराक्रम करून ते देशापुढील सर्व समस्या सोडवतील. मी योजना तयार केली आहे आणि तिच्यासाठी माझे जीवन वाहिले आहे... केंद्रोकेंद्री असे धर्मप्रसारक पसरतील आणि सगळा भारतवर्ष व्यापतील.

कुणीही सत्य, प्रेम आणि निष्कपटता यांच्या शक्तीला रोधू शकणार नाही. तुम्ही सच्च्या दिलाचे आहात काय? मरण आले तरी तुम्ही नि:स्वार्थ राहू शकता का? तुमचे हृदय प्रेमाने भरले आहे का? जर असे असेल तर तुम्ही कुणालाही, एवढेच नव्हे तर मृत्यूलाही भिण्याचे कारण नाही. वत्सांनो, पुढे चला ! साऱ्या जगताला ज्ञानाच्या प्रकाशाची आवश्यकता आहे. हा प्रकाश मिळविण्यासाठी ते मोठ्या उत्सुकतेने आपल्याकडे पाहत आहे. केवळ भारतापाशीच हा ज्ञानाचा प्रकाश आहे. तो इंद्रजाल, जादू वा भोंदूगिरी यामध्ये नसून धर्माच्या खऱ्या उपदेशांमध्ये, सर्वोच्च आध्यात्मिक सत्यांच्या महान उपदेशांत तो सामावलेला आहे. जगाला हा प्रकाश देण्यासाठीच प्रभूने या जातीला अनेक आपत्तींमधून वाचवून आतापर्यंत जिवंत ठेविले आहे. आता हा प्रकाश देण्याची वेळ आली आहे. हे वीर युवकांनो, विश्वास असू द्या की तुम्ही सर्वजण महान कार्ये करण्यासाठी जन्माला आला आहात. कुत्र्यांच्या भुंकण्याने भयभीत होऊ नका - एवढेच नव्हे तर आकाशातून वज्रपात जरी झाला तरी भिऊ नका. उठा, उठा, कामाला लागा.

उत्साहाने हृदय भरून घेऊन चारही दिशांना पसरा. काम करा. नेतृत्व करीत असतानाही सेवक बना, नि:स्वार्थ व्हा. आणि एखादा मित्र अन्य एखाद्या मित्राची त्याच्या पाठीमागे निंदा करू लागला तर ती कधीच ऐकू नका. अनंत धीर असू द्या. नेहमी सावध रहा ! जे जे म्हणून असत्य असेल ते कटाक्षाने टाळा; सत्याची कास

कोणत्याही परिस्थितीत सोडू नका. अशाने उशिरा का होईना, पण यश आपले आहे हे निश्चित समजा. फक्त एकट्या आपल्यावरच साऱ्या कार्याची मदार आहे अशा भावनेने काम करा. भावी पन्नास शतके तुमच्या कार्याकडे डोळे लावून बसली आहेत. भारताचे भवितव्य तुमच्यावर अवलंबून आहे. कंबर कसून कामाला लागा.

आमरण काम करा - मी तुमच्या पाठीशी आहे आणि माझ्या पश्चात माझा आत्मा तुमच्याबरोबर कार्य करील. हे जीवन येते आणि जाते - संपत्ती, कीर्ती, सुखोपभोग ह्या सर्व गोष्टी फक्त काही दिवसांपुरत्याच असतात. संसारात गुरफटलेल्या किड्याप्रमाणे मरण्यापेक्षा सत्याचा प्रचार करीत करीत कर्तव्याच्या क्षेत्रात मरण येणे कितीतरी पटीने श्रेयस्कर आहे. पुढे चला. आपले मज्जातंतू शक्तिसंपन्न करा. आपल्याला लोखंडी स्नायू व पोलादी मज्जातंतू हवे आहेत. आपण पुष्कळ दिवस रडलो. आता रडणे पुरे, आता आपल्या पायावर उभे रहा व मनुष्य बना.

प्रथमत: आज्ञाधारकपणा शिका. पाश्चिमात्य देशात, स्वातंत्र्याची वृत्ती जरी प्रबळ असली तरी आज्ञाधारकपणाची प्रवृत्तीही तितकीच प्रबळ आहे. आपल्यापैकी प्रत्येकालाच स्वत:चे अतिशय महत्त्व वाटते, त्यामुळे आपल्या हातून कोणतेही काम घडून येत नाही. जबरदस्त साहस, असीम धैर्य, प्रचंड उत्साह, आणि या सर्वांपेक्षाही संपूर्ण आज्ञाधारकपणा या गुणविशेषांमुळेच व्यक्तीचे व राष्ट्राचे पुनरूत्थान घडून येत असते. या गुणविशेषांचा आपल्यामध्ये संपूर्ण अभाव आहे.

अधिकारी जोपर्यंत पुढे होऊन मृत्यूशी झुंज घ्यायला उभा ठाकत नाही तोपर्यंत त्याच्या हाताखालील शिपाई काय खरोखरीच लढू शकतात? प्रत्येक क्षेत्राला हेच तत्त्व लागू आहे. शिरदार तो सरदार - कोणत्याही महत्त्कार्यासाठी जर तुम्ही आपल्या मस्तकाचे बलिदान करू शकला तरच तुम्हाला नेतृत्व प्राप्त होऊ शकेल. पण कोणतेही बलिदान न करता आपल्याला नेतृत्व मिळावे असे सर्वांना वाटते. त्याचा परिणाम होतो - शून्य. कोणीही आपले ऐकत नाही.

तुमच्या पाठीशी लोक किती मोठ्या संख्येने आहेत याचे महत्त्व नाही. ते गरीब आहेत की श्रीमंत आहेत याचेही महत्त्व नाही. मनसा-वाचा-कर्मणा जर



त्यांच्यात ऐक्य असेल तर असे मूठभर लोकसुद्धा सगळे जग उलथेपालथे करू शकतात, ही श्रद्धा हृदयात सतत बाळगा, तिचा कधीही विसर पडू देऊ नका. होऊ द्या विरोध. जितका विरोध होईल तितका चांगला. अडथळा आल्याशिवाय का नदीला वेग प्राप्त होतो? गोष्ट जितकी नूतन आणि श्रेष्ठ असेल तितका तिला प्रारंभी अधिक विरोध होणारच. आपल्याला शेवटी यश नक्की मिळणार हेच हा विरोध सांगत आहे.

तुम्ही खरोखरच जर माझी मुले असाल तर तुम्हाला कशाचीही भीती बाळगायला नको, कशानेही तुमच्या प्रगतीत बाधा यायला नको. तुम्ही सिंहासारखे व्हाल. आपण साऱ्या भारताला, समस्त जगताला जागृत केले पाहिजे... माझ्या मुलांनी कार्यसिद्धीसाठी पेटत्या अग्नीत देखील उडी घ्यायची तयारी ठेवायला हवी.

दुसऱ्यांसाठी येवढेसे जरी काम केले तरी ती आतली शक्ती जागृत होते, दुसऱ्याबद्दल थोडासा जरी विचार केला तरी हृदयात सिंहबळाचा संचार होतो. तुमच्यावर माझे येवढे अलोट प्रेम आहे, पण तरीही मला वाटते की दुसऱ्यासाठी तुम्ही आपले प्राण वेचावेत. ते तुमचे मरण पाहून मला आनंदच होईल.. उठून कामाला लागा - आयुष्य तरी किती दिवसांचे आहे? जगात आलाच आहात तर काही चिन्ह मागे ठेवून जा. एरव्ही वृक्षपाषाणही निर्माण होतात आणि नष्ट होतात. त्यांच्यात आणि तुमच्यात फरक तरी काय मग ?

अरे, मृत्यु जर अटळच असेल तर क्षुद्र किड्यांप्रमाणे मरण्यापेक्षा वीरोचित मरण कवटाळणे अधिक बरे नाही का? या अनित्य संसारात दोन दिवस अधिक जगून तरी काय लाभ? **It is better to wear out than to rust out.** जराजीर्ण अवस्थेत खितपत पडून थोडेथोडे मरण्यापेक्षा, अल्पकालच का होईना, पण परकल्याणार्थ झटून चटकन मरून जाणे बरे नाही का?

भारत पुन्हा उठेल. संदेहच नाही. पण जडाच्या शक्तीने नव्हे, चैतन्याच्या शक्तीने. ध्वंस, विनाशाचा झेंडा नाचवून नव्हे, शांती-प्रेमाची विजयपताका फडकावीत....

एक जिवंत दृश्य मात्र माझ्या दृष्टीला दिसत आहे ते हे की आपली ही प्राचीन भारतमाता पुनश्च जागृत झाली आहे. नवसंजीवन लाभून पूर्वीपेक्षाही अधिक

महिमाशाली होऊन सिंहासनावर गौरवाने अधिष्ठित झाली आहे. शांतीच्या आणि आशीर्वादांच्या शब्दांनी समस्त वसुधातलावर तिच्या शुभनामाचा जयघोष करा.

बंधूंनो, आपल्याला आता कठोर परिश्रम करावे लागतील, खूप खूप झटावे लागेल; आता झोपायला वेळ नाही. आपल्या कार्यावरच भारताचा भविष्यकाळ अवलंबून आहे. आपली ही भारतमाता हळूहळू नेत्र उघडीत आहे. ती काही काळ अंमळ निद्रिस्त झाली होती इतकेच. उठा, तिला जागे करा - आणि ह्या नवजागृतीच्या संजीवनाने तिला पूर्वीपेक्षाही अधिक गौरवान्वित करून भक्तिभावाने तिची तिच्या चिरंतन सिंहासनावर स्थापना करा!

ꙮ०ꙮ



मराठी सिनियर (इयत्ता ८ ते १०)
विशेष सूचना :
१.प्रत्येकास फ ३ मिनिटे दिली जातील.
२. कृपया विषयास धरून बोलावे.
३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे :
(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता : १० गुण (क) प्रभाव : १० गुण

## तुम्हीच तुमचे भाग्यविधाता

माझ्या आयुष्यात जी एक फार महत्त्वाची गोष्ट मी शिकलो आहे ती ही की कर्माच्या बाबतीत साध्याइतकेच साधनाकडेही लक्ष द्यायला पाहिजे... त्या एकाच तत्त्वापासून मी नेहमी अनेक महत्त्वाचे धडे शिकत आलो आहे आणि मला वाटते की साध्याइतकेच साधनाकडे लक्ष देणे ह्या एकाच तत्त्वात सर्व कर्माच्या यशाचे रहस्य सामावलेले आहे

सर्वसाधारण माणूस स्वत:च्या आयुष्यातील सगळे दोष, सगळ्या चुका आपल्या शेजाऱ्यांवर लादू पाहत असतो, ते न जमल्यास ईश्वरावर लादू जातो, आणि तेही न साधल्यास दैव नावाचे एक भूत खडे करून त्याला वेठीस धरतो. परंतु वस्तुत: दैव म्हणजे खरोखर काय? ते राहते तरी कुठे? आपण जे पेरतो तेच उगवत असते. आपल्या दैवाचे आपणच निर्माते आहोत. त्यासाठी दुसऱ्या कोणाला निंदायलाही नको आणि वंदायलाही नको. वारा वाहत असतो; ज्या नावांची शिडे उभारलेली असतात त्यांना तो लाभतो आणि त्या भरल्या शिडाने ती नावे आपला मार्ग आक्रमतात, परंतु ज्या नावांची शिडे गुंडाळलेलीच असतात त्यांना त्या वाऱ्याचा काहीच फायदा होत नाही, हा काय त्या वाऱ्याचा दोष?

म्हणा की, जे हे दु:ख मी भोगतो आहे ते माझ्याच कृत्यामुळे होय. ह्यावरूनच हेही सिद्ध होते की ते माझ्याकडूनच नष्ट होऊ शकेल. जे मी निर्माण केले आहे त्याचा मी ध्वंस करू शकेन; जे दुसऱ्या कुणी निर्माण केले आहे त्याचा नाश करण्यास मी कधीच समर्थ होऊ शकणार नाही. म्हणून उठा, धीट बना, शक्तिमान बना. सगळी जबाबदारी स्वत:च्याच खांद्यावर घ्या, आणि पक्की खूणगाठ बांधून रहा की तुमच्या भाग्याचे तुम्हीच विधाते आहात. जे बल वा जे सहाय्य तुम्हास हवे आहे ते तुमच्या स्वत:च्या आतच आहे.

स्वत:च स्वत:चे भवितव्य घडवा. **गतं न शोच्यम्**. जे झाले ते होऊन गेले, त्याबद्दल खंत करीत बसू नका. म्हणतात ना की वाहिले ते पाणी नी राहिली ती गंगा. अनंत भावीकाळ तुमच्यापुढे विस्तारलेला आहे आणि हे तुम्ही नेहमी लक्षात ठेवावयास हवे की तुमचा प्रत्येक शब्द, प्रत्येक विचार नि प्रत्येक कृत्य तुमच्या गंगाजळीत संचित राहील. आणि हे पण सदा लक्षात असू द्या की, तुम्ही केलेले कुविचार आणि तुम्ही केलेली कुकर्मे ज्याप्रमाणे वाघासारखे तुमच्यावर झेप घेण्यास टपून आहेत, त्याचप्रमाणे ही देखील मोठ्या स्फूर्तीदायी आशेची गोष्ट आहे की तुमचे सद्विचार आणि तुमची सत्कर्मे हजारो लाखो देवदूतांच्या शक्तीने तुमचे रक्षण करण्यास समर्थ आहेत.

आपल्या वर्तमान अवस्थेला आपण स्वत:च जबाबदार आहोत, आणि पुढे जे काही होण्याची आपली इच्छा आहे ते होण्याची शक्तीदेखील आपल्यात विद्यमान आहे. आणि आपली आजची अवस्था जर आपल्या पूर्व कर्माच्या द्वारा नियमित होत असेल, तर मग त्याबरोबर हेही आलेच की, भविष्यकाळी जसे म्हणून बनण्याची आपली मनीषा आहे तसे आपण आपल्या चालू कर्मांनीच बनू शकू. जर तुम्ही कोणाहीविषयी द्वेष व असूयाभाव प्रकट केला तर तो चक्रवाढ व्याजानिशी तुमच्याकडे परत येईल. कोणतीही शक्ती याचा प्रतिकार करू शकत नाही. एकदा तुम्ही त्यांना चालना दिली की त्यांचा परिणाम तुम्हाला भोगावाच लागेल. हे लक्षात ठेवल्यास तुमच्या हातून वाईट गोष्टी घडणार नाही.

आपण केलेला प्रत्येक विचार, आपण केलेली प्रत्येक क्रिया काही कालाने सूक्ष्म रूप धारण करते, जणू बीजरूप धारण करते, आणि अव्यक्त रूपाने या सूक्ष्म शरीरात राहते, आणि कालांतराने फिरून प्रकट होऊन अनुरूप फल देते. या फलांनी माणसाचे जीवन नियंत्रित होत असते. याप्रमाणे माणूस स्वत:च्या कर्मांनीच स्वत:चे जीवन घडवित असतो. माणूस आणखी कोणत्याही नियमाच्या अधीन नाही, केवळ स्वत:च्याच कर्मबंधनांनी तो बांधला आहे. पावित्र्य, धीर, चिकाटी व याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे प्रेम ह्या गोष्टींची यशस्वी होण्यासाठी अत्यंत आवश्यकता असते.

मांगल्याकडे जाणारा या जगातील मार्ग अत्यंत बिकट, त्रासदायक, किंबहुना निसरड्या कड्यासारखाच असतो. तेव्हा या कड्यावरून जाताना कित्येकांनी कोसळावे यात नवल मुळीच नाही; अनेकांना या मार्गवरून जाण्यात



यश येते हीच खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे. या मार्गात हजारो प्रमाद होतील, अनेकदा ठेच लागेल. परंतु यातूनच चारित्र्य तावूनसुलाखून निघते. सदा चांगली कामे करीत चला; हीन संस्कार निवारण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. अमुक माणसाच्या उद्धाराची आता काही आशा नाही असे कदापि म्हणू नका, कारण वाईट मनुष्य म्हणजे एक विशिष्ट प्रकारचे चारित्र्य आणि चारित्र्य म्हणजे काही विशिष्ट सवयींची गोळाबेरीज; आणि या सवयी नव्या व चांगल्या सवयींनी काबूत आणता येतात. दूर करता येतात. चारित्र्य म्हणजे सवयींची पुनरावृत्ती, आणि म्हणूनच फक्त सवयींच्या पुनरावृत्तीनेच ते बदलू शकेल - सुधरू शकेल. ब्रह्मचर्यवान व्यक्तींच्या मेंदूत विलक्षण सामर्थ्य वास करीत असते आणि तिच्या ठिकाणी प्रचंड इच्छाशक्ती उत्पन्न होत असते.

एखाद्याचे चारित्र्य तुम्हाला खरोखर नीट जोखावयाचे असेल तर त्याच्या मोठमोठ्या कार्यांकडे लक्ष देऊ नका; प्रसंगविशेषी एखादा ठोंब्या देखील वीर बनून शौर्य गाजवू शकेल. माणसावर, तो अगदी मामुली कामे उरकीत असताना लक्ष ठेवा. वस्तुत: त्यांच्यातूनच तुम्हाला थोर पुरुषांच्या खऱ्या चारित्र्याचे दर्शन घडू शकेल. मोठमोठ्या प्रसंगी आवेशाच्या भरात अगदी य:कश्चित माणसालाही काहीतरी शतकृत्य करून टाकण्याचा चेव येत असतो. परंतु ज्याच्या चारित्र्याचा शोभनीय गौरव सर्वच अवस्थांतून निरंतर प्रकट होत असतो तोच खराखरा थोर पुरुष म्हणावा.

कसल्याही तऱ्हेच्या मोबदल्याचा विचार मनात न आणता आपण जगात प्रेषित केलेला प्रत्येक सद्विचार संचित होऊन राहील. जोवर आपण अत्यंत पवित्र होऊन जात नाही तोवर आपल्याला तो सद्विचार हळूहळू अधिकाधिक पवित्र करीत राहील. आपले स्वत:चे जीवन जर शुद्ध व चांगले असेल तरच जग चांगले व शुद्ध होईल. तो परिणाम आहे. आपण त्याचे कारण आहोत. म्हणून आपण स्वत:ला शुद्ध करू या. आपण स्वत: पूर्ण बनू या.

भांडण्यात, मारामाऱ्या करण्यात, तक्रारी करण्यात काय अर्थ आहे? जो आपल्या वाट्याला आलेल्या सामान्य कामाविषयी कुरकुर करतो तो सर्वच कामांविषयी कुरकुर करील. नेहमी कुरकुर करणारा मनुष्य जीवनात नेहमी दु:ख भोगतो. तो कोणतेही काम हाती घेवो, त्यात त्याला यश म्हणून येत नाही. पण जो मनुष्य अंग मोडून आपले कर्तव्य चोखपणे बजावतो तो यशस्वी होतो आणि

त्याला अधिकाधिक उच्च कार्ये करण्याची संधी मिळते.

हे जग म्हणजे एक विशाल व्यायामशाळा असून येथे आपण स्वत:चे सामर्थ्य वाढविण्यासाठी येत असतो. ह्या जगत्-यंत्राच्या दातेरी चक्रापासून दूर पळू नका. आतच उभे राहून कर्माचं रहस्य समजून घ्या. आतच राहून कुशलपूर्व कर्म केल्यानेही बाहेर पडता येते. लक्ष्यभेदाचा प्रयत्न आपण सर्वांनीच का करू नये? पडतपडतच आपण चालायला शिकत असतो. विफल होतहोतच आपण ज्ञानाच्या पायऱ्या चढत असतो.

दुर्दैवाने ह्या जगात बहुसंख्य लोक कोणताही आदर्श, कसलेही ध्येय समोर नाही अशा स्थितीत आपल्या अंधाऱ्या जीवनात चाचपडत असतात. समोर एखादा आदर्श असलेला मनुष्य जर हजार चुका करील तर, माझी खात्री आहे की, समोर कोणताही आदर्श नसलेला मनुष्य पन्नास हजार चुका करील. म्हणून जीवनात एखादा आदर्श असणेच श्रेयस्कर आहे.

माझे ध्येय काही थोड्या शब्दांत मांडले जाऊ शकते. आणि ते याप्रमाणे : मानवाला त्याच्या ठिकाणी वास करणाऱ्या ईश्वरत्वाचा उपदेश देणे आणि जीवनातील प्रत्येक कार्यात हे ईश्वरत्व कसे प्रकट करावे यासंबंधीचा मार्ग दाखवून देणे.

सृष्टीतील समस्त शरीरांमध्ये मनुष्य शरीरच सर्वात श्रेष्ठ शरीर होय. मनुष्यप्राणी हा विश्वातील सर्व प्राण्यांतील श्रेष्ठ प्राणी होय. मनुष्य सर्वश्रेष्ठ जीव होय. माणूस सर्व प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ आहे. माणसापेक्षा श्रेष्ठ कोणीच नाही.

प्रकृतीविरूद्ध जे जे म्हणून बंड करून उठते, तेच चेतन. तेथेच चैतन्याचा विकास झालेला असतो. बघाना, एखाद्या क्षुद्र मुंगीला चिरडण्याचा प्रयत्न करा, ती देखील प्राणरक्षणासाठी झगडण्याचा प्रयत्न करील. जेथे प्रयत्न आहे, जेथे संघर्ष आहे, बंड आहे, तेथे जीवनाचे चिन्ह असते, तेथेच चैतन्याचा विकास झालेला असतो. मनुष्य प्रकृतीशी झगडतो. तो पुष्कळ चुका करतो. त्याची फळे तो भोगतो पण सरतेशेवटी तो प्रकृतीवर विजय मिळवतो आणि आपल्या मुक्त स्वरुपाचा त्याला अनुभव येतो. जेव्हा तो मुक्त होतो तेव्हा प्रकृती त्याची दासी बनते.

जोवर प्रकृतीच्या वर उठण्याची धडपड करीत आहे तोवरच माणूस हा



माणूस असतो. आपण जर नाना राष्ट्रांचा इतिहास नीट काळजीपूर्वक वाचून पाहिला तर आपल्याला असे हमखास आढळून येईल की, अशा माणसांची संख्या जेव्हा वाढते तेव्हाच कोणत्याही राष्ट्राचा अभ्युदय होत असतो.

सर्व निकोप सामाजिक फेरफार म्हणजे मनुष्याच्या अंत:करणात कार्यप्रवण असलेल्या आध्यात्मिक शक्तींचे आविष्कार होय. ह्या आध्यात्मिक शक्ती जर बलसंपन्न व संतुलित असतील तर समाज त्या परिवर्तनाशी स्वत:ला योग्य प्रकारे जुळवून घेईल. प्रत्येक व्यक्तीला स्वत:चा उद्धार स्वत:च साधून घ्यावा लागेल. त्यासाठी दुसरा उपाय नाही, आणि हाच न्याय देशांनाही लागू आहे.. सगळेच सामाजिक नियम थोड्याफार प्रमाणात अपूर्ण असल्यामुळे त्यांच्या उणिवा दाखविणे अगदी सोपे असते. परंतु कोणत्याही नियमाच्या प्रभावाखाली राहणाऱ्या एखाद्या व्यक्तीला अपूर्णतेवर मात करण्याच्या बाबतीत जो मनुष्य मदत करतो तोच मानवजातीचा खराखुरा उपकारकर्ता होय. व्यक्तीचा विकास झाला की देशाचा आणि सामाजिक नियमांचा विकास झालाच पाहिजे.

तुमचा विकास आतून झाला पाहिजे. तुम्हाला कोणीही शिकवू शकत नाही. तुमच्या स्वत:च्या आत्म्याव्यतिरिक्त तुमचा दुसरा कोणताही शिक्षक नाही.

उपहास, विरोध व अखेर स्वीकार या तीन अवस्थांतून प्रत्येक कार्याला आपली वाट काढावी लागते. आपल्या कालाच्या पुढे जाऊन विचार करणाऱ्या प्रत्येक माणसाबद्दल खात्रीने गैरसमज उत्पन्न होत असतात. तेव्हा विरोधाला आणि छळवणुकीला माझी आनंदाने तयारी आहे. मी स्थिर आणि पवित्र असायला हवे, भगवंतावर माझा दृढ विश्वास असायला हवा म्हणजे मग या साऱ्या अडचणी कुठल्या कुठे नाहीशा होऊन जातील. Ours not to reason why, ours but to do and die. ''का?'' असा प्रश्न करण्याचा आपल्याला अधिकार नाही - कार्य करता करता मृत्युमुखी पडणे हेच आपले कर्तव्य होय. साहस बाळगा, भगवंताने आपल्याला थोर कर्मे करण्यासाठी निवडले आहे, असा विश्वास असू द्या आणि ती आपण करूच करू. भ्याड व मूर्ख मनुष्यच 'हे दैव आहे' असे म्हणतो असे एक संस्कृत सुभाषित आहे. पण जो मनुष्य बलवान असतो तो उठून उभा राहतो आणि म्हणतो, 'मी माझे दैव घडवीन.' आपण स्वत: जर दुबळे नसलो तर कोणत्याही गोष्टीचा आपल्यावर परिणाम होत नाही ही गोष्ट आपण ध्यानात ठेवली पाहिजे.

एकदा मी हिमालयातून प्रवास करत होतो. लांबच लांब मार्ग आमच्यापुढे पसरला होता. आम्ही गरीब संन्यासी ! आम्हाला उचलून कोण नेणार ? म्हणून आम्हाला सर्व मार्ग पायीच आक्रमिणे भाग होते. आमच्याबरोबर एक वृद्ध संन्यासी होता,... तो म्हणाला,''महाराज, हा रस्ता कसा पार करायचा? माझ्याच्याने आता चालवणार नाही. माझी छाती फुटून जाईल.'' मी त्याला म्हणालो, ''तुम्ही खाली आपल्या पायाकडे पहा.'' त्याने तसे केले. मग मी म्हणालो,''तुमच्या पायाखाली जो रस्ता आहे तो तुम्ही आक्रमिलेला आहे. आणि तोच रस्ता तुमच्यासमोर तुम्ही पाहत आहात. तोही लवकरच तुमच्या पायाखाली येईल.''

प्रत्येक जीव अव्यक्त ब्रह्म होय. बाह्य आणि अंत: प्रकृतीला वशीभूत करून स्वत:चे हे अव्यक्त ब्रह्मस्वरुप व्यक्त करणेच जीवनाचे परम उद्दिष्ट होय. कर्म, उपासना, मन:संयम वा ज्ञान यापैकी कोणत्याही एकाचा वा एकापेक्षा अधिकांचा किंवा सर्वच उपायांचा अवलंब करून ते उद्दिष्ट साधा आणि मुक्त व्हा.

साऱ्यांपाशी जाऊन त्यांना उच्च स्वराने सांगा, ''उठा जागे व्हा. आता झोपून चालायचे नाही. साऱ्या उणिवा, सारे दु:ख समूळ नष्ट करण्याची शक्ती तुमच्यातच आहे. यावर दृढ विश्वास ठेवा म्हणजे ती शक्ती आपोआपच जागृत होईल.'' तुम्ही देखील 'आपल्यात अनंत शक्ती वसत आहे, अपरंपार ज्ञान साठविले आहे, अदम्य उत्साह रसरसतो आहे' असे चिंतन कराल आणि त्याबरोबरच जर या अंत:स्थ शक्तीला जागे करू शकाल तर तुम्हीही माझ्यासारखे व्हाल !